सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ९८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भरतीला स्थगिती

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका सरळसेवा भरती अंतर्गत गट-अ, गट-ब व गट-क मधील २० संवर्गातील १३२ पदांकरिता मंगळवारी ( दि. २१) आणि बुधवारी (दि. २२) होणारी लेखी परीक्षा होणार होती. दरम्यान, या भरती प्रक्रियेलाच सोमवारी (दि.२०) झालेल्या महासभेत सभागृहाने स्थगिती देण्याचा ठराव मंजूर करून तो कायम केला.
केवळ नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सभागृह नेते सागर नाईक यांनी स्पष्ट केले. तात्काळ परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा स्थगित केल्याची माहिती महापालिकेने द्यावी, असे निर्देश महापौर सुजाता पाटील यांनी दिले.
महापालिकेने १३२ पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली होती. त्यासाठी राज्यभरातून एकूण १९,२२० उमेदवारांनी अर्ज केले होते. त्या अनुषंगाने सहा संवर्गाची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ऑनलाईन स्पर्धा परीक्षा उद्या दि.२१ व २२ जुलै या कालावधीत ६ जिल्ह्यांतील १३ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार होती. मात्र, सोमवारी सत्ताधारी भाजपकडून सभागृह नेते सागर नाईक यांनी नवीन भरती नियम पुढच्या महासभेत सभागृहात आणला जाणार आहे. नवी मुंबईतील स्थानिक मुलांना भरतीत न्याय मिळू शकेल. यामुळे उद्या होणारी परिक्षा रद्द करून भरती प्रक्रिया स्थगित करण्याचा ठराव मांडण्यात आला.

# किनारपट्टीची दुरावस्था

मुंबई : सागरी किनारी कचरा टाकू नका, असे वारंवार महापालिकेडून मुंबईकरांना सांगितले जाते. एवढेच नव्हे तर कचरा हा निर्माल्य पेटीतच टाका असे ठिकठिकाणी बोर्ड लावलेले असतात. मात्र या सूचनांकडे दुर्लक्ष करत मुंबईकर सागरी किनाऱ्यावर कचरा टाकताना दिसत आहेत.त्याचा विपरित परिणाम समोर आला असून समुद्राला आलेल्या भरतीमुळे मुंबईकरांनी टाकलेल्या कचऱ्याचे ढीग पुन्हा किनाऱ्यावर येत आहेत. त्यामुळे जुहू आणि दादर चौपाटीसह प्रमुख चौपाट्यांचे विद्रुपीकरण जोरात होत आहे. याची दृश्ये सोशल मीडियावर समोर आली आहेत. यातून किनारपट्ट्यांची दुरवस्थेची भीषणता समोर आली आहे.

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

मुंबई : बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील पावसाच्या सरींना पुन्हा एकदा चालना मिळाली आहे. या हवामान बदलामुळे राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाची शक्यता असून, पुढील आठवडाभर पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज हवामान अभ्यासकांनी व्यक्त केला आहे.नवीन अंदाजानुसार, आज सोमवारपासून (दि.२० जुलै) शनिवारपर्यंतच्या या सहा दिवसांच्या काळात राज्यभरात बहुतांश ठिकाणी बऱ्यापैकी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या कालावधीत बुधवार आणि गुरुवार मध्यम पावसाचा अंदाज असून, या दोन दिवसांत राज्यभरात मध्यम स्वरूपाचा पाऊस पाहायला मिळेल.तसेच विदर्भातील काही भागांत जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. मात्र, उर्वरित दिवसांत विविध ठिकाणी मुसळधार पाऊस हजेरी लावण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून, एकूणच आजपासून पुढील आठवडाभर पावसाचा जोर वाढलेला दिसेल.

# अगरबत्तीतून उलाढाल

मुंबईः आषाढी एकादशीचा सोहळा अवघ्या सहा दिवसांवर आला आहे. त्यामुळे पंढरपुरातील प्रासादिक साहित्य, भजनी साहित्य, अगरबत्ती आदींची बाजारपेठ सजली आहे.

# आता स्वयंपाक घरातही येणार इथेनॉल!

वृत्तसंस्था
नवी दिल्ली : पेट्रोलमध्ये इथेनॉल ब्लेंड केल्यामुळं गाड्या खराब होत आहे याबाबतच्या अनेक चर्चा सोशल मीडियावर सुरू असतात. मात्र आता हे वादग्रस्त इथेनॉल थेट तुमच्या स्वयंपाक घरात येणार आहे. आता जेवण बनवण्यासाठी एलपीजी, पीएनजीच्या ऐवजी इथेनॉल वापरलं जाऊ शकतं. यासाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय लवकरच एक धोरण आणण्याच्या तायारीत आहे.एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितलं की, एलपीजी सोबतच घरात जेवण करण्यासाठी इथेनॉलची देखील मदत होणार आहे. हे धोरण सप्टेंबर महिन्यापर्यंत तयार होण्याची शक्यता असून याबाबत मंत्रालयाने अजून पर्यंत कोणतेही उत्तर दिलेले नाही.फेब्रुवारी महिन्यात



प्रसिद्ध झालेल्या इंटरनॅशनल इस्टिट्युट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटच्या रिपोर्टनुसार इंडिया क्लीन कुकिंग शिफ्टनुसार इ कुटिंग आणि बायगॅसकडे वळल्यामुळं भारत २०५० पर्यंत एलपीजी सबसिडीमध्ये २ लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त रक्कम वाचवू शकतो.इथेनॉल पर्यावरणानुसार इंधन असून ते ऊस, धान्य आणि इथर शुगरी पिकांच्या फर्मंटेशनने तयार होते. यामुळं एप्रिल महिन्यात इकॉनॉमिक्स टाईम्सने सरकार इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हची चाचणी घेत आहे. जेवण तयार करण्यासाठी इथेनॉलचा वापर करण्याने भारताचे एलपीजीवरील अवलंबत्व कमी होणार असून त्यामुळं एलपीजी आयातीचा जो खर्च असेल तो देखील कमी होणार आहे.स्वयंपाकघरात इथेनॉलच्या वापरासाठी सरकार एकाचवेळी मोठी गुंतवणूक किंवा सतत आर्थिक सहाय्य म्हणजे सबसिडी देऊ शकते.इथेनॉलचा वापर जेवण तयार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यामागे भारतात इथेनॉलची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर आहे हे एक प्रमुख कारण आहे. देशात इथेनॉल उत्पादन क्षमता वर्षाला २० अब्ज लीटरपेक्षा देखील जास्त आहे. या आर्थिक वर्षात अजून ४ अब्ज लीटर वाढणार आहे.

# 'ब्लॅक मंडे'चा शेअर बाजाराला जबरदस्त फटका!

तभा वृत्तसेवा
मुंबई : आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजारात मोठी पडझड पाहायला मिळाली. सोमवारी भारतीय शेअर बाजारात विक्रीचा जोर वाढल्याने बीएसई सेन्सेक्स ७०० हून अधिक अंकांनी घसरला, तर निफ्टी १८० अंकांच्या आसपास घसरून व्यवहार करत होता. या घसरणीमुळे लाखो गुंतवणूकदारांना मोठा फटका बसला. मात्र, हा धक्का केवळ भारतापुरता मर्यादित नसून आशिया ते युरोपपर्यंत अनेक प्रमुख शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण नोंदवण्यात आली.शुक्रवारी ७८,१५१.४५ अंकांवर बंद झालेला सेन्सेक्स सोमवारी बाजार उघडताच ६०० हून अधिक अंकांनी घसरून ७७,५४२ वर आला. दुपारपर्यंत घसरण आणखी वाढत ७०० अंकांहून अधिक झाली. दुसरीकडे, २४,३४४ अंकांवर बंद झालेला निफ्टीही घसरून २४,१३५ च्या पातळीवर पोहोचला.भारतीय बाजारातील घसरणीमागे आशियाई बाजारातील नकारात्मक संकेत हे प्रमुख कारण मानले जात आहे. सेन्सेक्स-



निफ्टीसाठी महत्त्वाचा निर्देशक असलेला गिफ्ट निफ्टी उघडताच १०० अंकांनी घसरला आणि नंतर ही घसरण वाढून २६२ अंकांपर्यंत पोहचली.जपानचा निक्केई निर्देशांक मोठ्या प्रमाणात घसरला, तर दक्षिण कोरियाचा कोस्पी (घजड्झख) निर्देशांकही सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसून आला.आशियातील बहुतांश बाजार लाल निशाणावर व्यवहार करत असल्याने जागतिक गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले.शेजारील पाकिस्तानच्या शेअर बाजारात सर्वाधिक घसरण पाहायला मिळाली. घडए-१०० निर्देशांक तब्बल १,७०० हून अधिक अंकांनी कोसळला, ज्यामुळे तेथील गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले.तज्ज्ञांच्या मते, भारतासह जागतिक बाजारातील या मोठ्या घसरणीमागे मध्य पूर्वेतील वाढता तणाव हे प्रमुख कारण आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत असल्याने जागतिक अर्थव्यवस्थेबाबत चिंता वाढली आहे.

# शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा देणार?



तभा वृत्तसेवा
नवी दिल्ली : नीट (NEET) पेपरफुटी प्रकरण, स्पर्धा परीक्षांतील कथित गैरव्यवहार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून कॉकरोच जनता पार्टीचे (उगझ) आंदोलन अधिक तीव्र झाले असतानाच मोठी राजकीय घडामोड घडली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीचा नेमका अजेंडा अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेला नसल्याने विविध चर्चांना उधाण आले आहे.दरम्यान, उगझने आयोजित केलेल्या 'चलो संसद' मोर्चादरम्यान दिल्लीत तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली.आंदोलकमोठ्या संख्येने संसद परिसराच्या दिशेने निघाले होते. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसू लागल्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज केला, तसेच अश्रुधुराच्या नळकांड्यांचाही वापर करण्यात आला आहे.संसद परिसरात सुरक्षा मोर्चा दरम्यान आंदोलक रेल भवनापर्यंत पोहोचल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली. खबरदारीचा उपाय म्हणून संसदेच्या दक्षिण प्रवेशद्वारासह काही प्रवेशमार्ग तात्पुरते बंद करण्यात आले.रेल भवन, ट्रान्सपोर्ट भवन, विजय चौक, रायसीना रोड आणि संसद परिसरात सीआरपीएफ, निमलष्करी दल आणि संसद सुरक्षा दलाचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलकांना मागे हटवण्यासाठी पोलिसांना जवळपास दीड तास प्रयत्न करावे लागल्याचे सांगितले जात आहे.रणावर उपोषण करणारे पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सोमवारी आपले उपोषण मागे घेण्याची घोषणा केली. त्यांच्या निर्णयानंतर आंदोलनाच्या पुढील टप्प्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'कॉकरोच' आंदोलना आडून मोदी – फडणवीसांना डॅमेज करण्याचा विरोधकांचा कट : चंद्रशेखर बावनकुळे

तभा वृत्तसेवा
मुंबई : नवी दिल्लीतील नीट पेपरफुटी प्रकरणाच्या आंदोलनावरून विरोधकांकडून सुरू असलेले राजकारण म्हणजे निव्वळ नौटंकी असून, या आंदोलनाच्या आडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा डागाळण्याचा (डॅमेज करण्याचा) विरोधकांचा कट असल्याचा आरोप महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. समाजात द्वेष निर्माण करण्यासाठीच अशा स्वरूपाची आंदोलने पेटवली जात असल्याची टीकाही त्यांनी केली.राजधानी दिल्लीत सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात नीट पेपरफुटी प्रकरणी आंदोलन सुरू असून, त्याला महाराष्ट्रातील विरोधी पक्ष व काही विद्यार्थी संघटनांनी पाठिंबा दिला आहे. या पार्श्र्वभूमीवर बावनकुळे यांनी विरोधकांचा समाचार घेतला. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य करण्यासाठी समाजात एक विशिष्ट गट सक्रिय झाला असून, विरोधकांचे हे 'कॉकरोच' आंदोलन म्हणजे निव्वळ नौटंकी आहे. हातात कोणताही ठोस मुद्दा उरला नसल्याने केवळ लोकांच्या मनात चीड निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पेपरफुटीमुळे काही विद्यार्थ्यांना नक्कीच मनस्ताप झाला असून ते या आंदोलनात सहभागी झाले आहेत, याचा अर्थ असा नाही की सरकारने यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. सिस्टममधील काही घटकांनी बदमाशी केली असून सरकारने त्यांच्यावर कठोर कारवाई केली आहे, तसेच नीट परीक्षा पुन्हा घेतली आहे. अशा वेळी सुधारणा सुचवण्याऐवजी केंद्रीय मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करून केवळ राजकारण केले जात आहे, असेही बावनकुळे म्हणाले.अयोध्या राम मंदिर प्रकरणावरून उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केलेल्या टीकेला उत्तर देताना बावनकुळे यांनी मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिराचे उदाहरण दिले. मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात जेव्हा भ्रष्टाचार झाला, तेव्हा तिथे उद्धव ठाकरे यांच्याच पक्षाचा अध्यक्ष होता; मग तेव्हा आम्ही मुख्यमंत्र्यांचा राजीनामा मागितला होता का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अयोध्येत चोरी करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जात आहे. मात्र, एखाद्या कर्मचाऱ्याच्या चुकीमुळे अध्यक्षांचा किंवा मंत्र्यांचा राजीनामा मागणे ही उद्धव ठाकरेंची नौटंकी असल्याची टीका त्यांनी केली. राम मंदिराच्या उद्घाटनाचे निमंत्रण असूनही मतांच्या लांगूलचालनासाठी आणि महाराष्ट्रात काही विशिष्ट मते कमी होतील या भीतीने ठाकरे अयोध्येला गेले नाहीत. आयुष्यभर प्रभू रामचंद्रांचा तिरस्कार करणाऱ्यांनी आता अशा आंदोलनांचे राजकारण करून काहीही साध्य होणार नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

# मुंबईत २३ जुलै ते ६ ऑगस्ट दरम्यान जमावबंदी

वृत्तसंस्था
नवी दिल्ली :'नीट' (छएएढ) परीक्षेचा मुद्दा आणि रोजगाराच्या प्रश्र्नावर दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने तातडीने आणि प्रभावी पावले उचलली आहेत. राजधानीत सुरक्षेच्या दृष्टीने कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, खबरदारीचा उपाय म्हणून मुंबईतही १५ दिवसांसाठी जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या प्रश्र्नावर सामंजस्याने तोडगा काढण्यासाठी सरकारने आंदोलकांसोबत सकारात्मक चर्चेची तयारी दर्शवली आहे.संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान कॉकक्रोच जनता पार्टीच्या (उगझ) कार्यकर्त्यांनी संसद भवनाकडे मोर्चा वळवला होता. मात्र, हा जमाव संसदेच्या अतिसंवेदनशील मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोहोचल्याने सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांना तात्काळ हस्तक्षेप करणे भाग पडले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि संसदेची सुरक्षा अबाधित राहावी, यासाठी दिल्ली पोलिसांनी परिस्थिती अत्यंत संयमाने हाताळली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना नाईलाजाने सौम्य बळाचा आणि अश्रुधुराचा वापर करावा लागला. संसदेचे दरवाजे तातडीने बंद करून परिसरात सीआयएसएफच्या (उखडऋ) जलद प्रतिसाद पथकाला (ठळ) तैनात करण्यात आले आहे. तसेच, अफवा पसरू नयेत म्हणून काही काळासाठी इंटरनेट सेवाही खंडीत करण्यात आली होती. या आंदोलनातील एक अतिशय महत्त्वाची आणि सकारात्मक बाब म्हणजे, सरकारच्या मध्यस्थीनंतर आंदोलनाचे नेते अभिजीत दीपके यांनी आपले अडीच दिवसांचे उपोषण मागे घेतले आहे. सरकारच्या वतीने ज्येष्ठ नेते जे. पी. नड्डा यांनी आंदोलकांच्या शिष्टमंडळाशी संवाद साधण्यास सहमती दर्शवली आहे. लोकशाहीत संवादाला असलेले महत्त्व ओळखून सरकारने उचललेले हे पाऊल स्वागतार्ह मानले जात आहे.

# राम मंदिर देणगी चोरी प्रकरण केवळ गुन्ह्याचा विषय, याचे राजकारण करू नका : सर्वोच्च न्यायालय

वृत्तसंस्था
अयोध्या : अयोध्या येथील राम मंदिर देणगी कथित चोरी प्रकरण केवळ गुन्ह्याचा विषय आहे, असे निरीक्षण नोंदवत या प्रकरणाचे राजकारण केले जाऊ नये. देणगी अपहार प्रकरणाची योग्य चौकशी सुनिश्र्चित करणे, हीच न्यायालयाची भूमिका असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने आज (दि.२०) स्पष्ट केले.न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशीची मागणीअयोध्या येथील राम मंदिरासाठी मिळालेल्या



देणगीतील कथित चोरी प्रकरणाची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी, अशी मागणी करणार्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या याचिकांमध्ये सीबीआय (उइख) चौकशी, फॉरेन्सिक ऑडिट आणि 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'च्या खात्यांचे 'कॅग' (उ-ऋ) द्वारे लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली होती. सुनावणीदरम्यान खंडपीठाने म्हटले की, हे केवळ गुन्हा घडल्याचे प्रकरण आहे. आम्ही येथे केवळ योग्य चौकशी सुनिश्र्चित करण्यासाठी आहोत. न्यायालये ही राजकारणाची जागा नव्हेत. तसेच, संबंधित पक्षांनी या मुद्द्याचे राजकारण करू नये, असेही न्यायालयाने बजावले.राम मंदिर देणगीतील कथित अपहाराची चौकशी करण्यासाठी 'विशेष तपास पथक' (ड्खढ) स्थापन करता येईल का, याबद्दल सूचना घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना सांगितले.यावर उत्तर देताना सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, एसआयटीची (ड्खढ) स्थापना आधीच करण्यात आली असून उत्तर प्रदेश पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ जुलै रोजी निश्र्चित करण्यात आली आहे; त्या दिवशी उत्तर प्रदेश सरकार एसआयटीच्या तपासाच्या प्रगतीबाबत न्यायालयाला माहिती देईल.

# मराठी भाषा आणि बोलींच्या संवर्धनाला मिळणार गती

## कृती आराखडा तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश; गडचिरोलीत नाट्य संकुल उभारणार

तभा वृत्तसेवा
मुंबई :मराठी भाषा, साहित्य आणि विविध बोलींचे जतन तसेच संवर्धन करण्यासाठी एक सर्वसमावेशक व प्रभावी कृती आराखडा तयार करून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. त्याचप्रमाणे, राज्य मराठी विकास संस्थेच्या दैनंदिन कामकाजात सातत्य, पारदर्शकता आणि गुणात्मकता आणण्याच्या दृष्टीने वर्षभरातील सर्व वैधानिक बैठकांचे वेळापत्रक आधीच निश्र्चित करण्यात यावे, अशी सूचनाही त्यांनी केली.सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या वेळी मराठी भाषा मंत्री उदय सामंत, विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, भाषा संचालक अरुण गीते यांच्यासह नियामक मंडळाचे अशासकीय सदस्य प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. राज्य मराठी विकास संस्थेने आपली सर्व वैधानिक अनुपालने यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाचे कौतुक केले. संस्थेचा गेल्या काही वर्षांतील प्रशासकीय व वैधानिक अनुशेष आता पूर्ण झाला असून, यामुळे प्रशासकीय चौकट अधिक बळकट झाली आहे. त्यामुळे आता केवळ कार्यालयीन कामकाजात न गुंतता मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संशोधन आणि संवर्धनासाठी ठोस धोरणात्मक पावले उचलणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. तसेच संस्थेतील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्र्नही सकारात्मकतेने सोडवले जातील, असे त्यांनी आश्र्वस्त केले.या बैठकीत सदस्यांनी मराठी भाषा आणि विविध प्रादेशिक बोलींच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडले. यामध्ये 'पुस्तकांचे गाव' आणि 'पेटी वाचनालय' या उपक्रमांची व्याप्ती वाढवून आदिवासी व सीमावर्ती भागांतील मराठी शाळांपर्यंत दर्जेदार साहित्य पोहोचवणे, झाडीबोली आणि पूर्व विदर्भातील समृद्ध नाट्यपरंपरेला राजाश्रय देण्यासाठी गडचिरोली-वडसा परिसरात हक्काचे नाट्य संकुल उभारणे, तसेच भारुड, गोंधळ, पोवाडा यांसारख्या पारंपरिक लोककलांच्या माध्यमातून मराठीचा सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवणे आणि बालसाहित्याला प्रोत्साहन देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. या सर्व सूचनांवर सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.तंजावर येथील मोडी लिपीत असलेल्या सुमारे १५ लाख ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा मुख्यमंत्र्यांनी या वेळी घेतला आणि या कामाला अधिक गती देण्याचे आदेश दिले. यासोबतच लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या जागतिक मराठी केंद्राच्या कामाचा आढावा घेऊन हा प्रकल्प वेगाने पूर्ण करण्याबाबत नियामक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. - मराठी भाषेचा जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी शासन स्तरावर सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिली. जगभरात ७५ आंतरराष्ट्रीय बृहन्महाराष्ट्र मंच स्थापन करण्याची प्रक्रिया गतिमान असल्याचे त्यांनी सांगितले. - दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) कुसुमाग्रज यांच्या नावाने अध्यासन केंद्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्यावर पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

# आषाढी वारीचा उत्साह शिगेला! आज खुडूस फाट्यावर रंगणार माऊलींचे दुसरे गोल रिंगण

तभा वृत्तसेवा
सोलापूर : आषाढी वारीतील सर्वाधिक आकर्षण असलेल्या सोहळ्यांपैकी एक असलेले संतश्रेष्ठ ज्ञानेश्र्वर महाराज माऊलीयांच्या पालखी सोहळ्यातील दुसरे गोल रिंगण उद्या, म्हणजेच मंगळवार २१ जुलै रोजी सकाळी ८ वाजता खुडूस फाटा (पानीव पाटी) येथे भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या ऐतिहासिक आणि पारंपरिक सोहळ्यासाठी हजारो वारकरी, भाविक आणि नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता असून संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.
शेकडो वर्षांची परंपरा लाभलेला हा गोल रिंगण सोहळा ज्योतीराम वाघ आणि जयवंत सिद यांच्या शेतजमिनीत पारंपरिक पद्धतीने भरविण्यात येतो. माऊलींचा अश्र्व रिंगणात धावताच उपस्थित वारकरी ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात तल्लीन होतात. हा क्षण अनुभवण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशभरातून भाविक मोठ्या संख्येने येथे दाखल होतात.रिंगण सोहळ्याच्या पार्श्र्वभूमीवर खुडूस ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थांनी जय्यत तयारी पूर्ण केली आहे. रिंगणस्थळाची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तात्पुरती शौचालये, आरोग्य सेवा, वाहतूक नियोजन, पार्किंग व्यवस्था तसेच भाविकांसाठी आवश्यक



मूलभूत सुविधांची उभारणी करण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा बंदोबस्तही वाढविण्यात आला आहे. पालखी मार्गावर विविध ठिकाणी आकर्षक स्वागत कमानी उभारण्यात आल्या असून भगवे ध्वज, फुलांची सजावट आणि टाळ-मृदुंगाच्या गजरामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.ग्रामस्थांनी वारकऱ्यांच्या स्वागतासाठी विशेष तयारी केली असून, 'संत येती घरा, तोचि दिवाळी-दसरा' या संतवचनाची प्रचिती येथे येत आहे.भाविकांसाठी अनेक ठिकाणी महाप्रसाद, फराळ, पिण्याचे पाणी आणि भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि स्वयंसेवक सेवाभावाने विविध जबाबदाऱ्या पार पाडत असून वारकऱ्यांच्या सेवेत स्वतःला झोकून देत आहेत.दरवर्षीप्रमाणे यंदाही रिंगण सोहळा शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक उपाययोजना केल्या असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. रिंगणानंतर पालखीचा पुढील प्रवास नियोजित मार्गाने पंढरपूरच्या दिशेने सुरू राहणार असून, आषाढी एकादशीपूर्वी संपूर्ण वारी भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.आषाढी वारीतील हे दुसरे गोल रिंगण केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून वारकरी संप्रदायाच्या श्रद्धा, समता, सेवा आणि भक्तीचा जिवंत उत्सव मानला जातो. त्यामुळे या सोहळ्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परभणी जिल्हा बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीत

## आ.सईदखान,आ.नवघरे यांच्यासह मुटकुळे, चोखट,डाखोरे, सावंत,श्रीमती बोबडे व मायदंळे विजयी. वरपूडकर - बोर्डीकर गटाचे स्पष्ट बहुमत: २१ पैकी १७ जागा ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी:-** परभणी जिल्हा बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीत आ.सईदखान,आ. नवघरे यांच्यासह मुटकुळे, चोखट,डाखोरे, सावंत,श्रीमती बोबडे व मायदंळे विजयी. वरपूडकर - बोर्डीकर गटाचे स्पष्ट बहुमतः २१ पैकी १७जागा ताब्यात.

परभणी,दि.२०(प्रतिनिधी) : परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीतआ.सईद खान,आ्. चंद्रकांत नवघरे या दोघांसह सौ.राजमती मुटकुळे,आकाश चोखट,नंदकुमार डाखोरे, अभय सावंत,श्रीमती शोभा बोबडे, दत्तात्रय मायंदळे हे आठ उमेदवार विजयी झाले आहेत. बँकेच्या एकूण २१ संचालक पदांपैकी १३ संचालक बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित ८ जागांसाठी रविवारी मतदान झाले.तर आज दुपारी मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण झाली. प्राथमिक कृषी पतपुरवठा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था गटातील पूर्णा मतदारसंघातून नंदकुमार डाखोरे हे ऑटोरिक्षा या निवडणूक चिन्हावर विजयी झाले आहेत. त्याचे प्रतिस्पर्धी तुळशीराम बोबडे हे कपबशी या चिन्हावर उभे होते ते पराभूत झाले. मानवत मतदारसंघातून बँकेचे ज्येष्ठ संचालक तथा उपाध्यक्ष पंडितराव चौखट यांचे सुपुत्र आकाश चौखट हे विजयी झाले आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी अमोल कदम हे ऑटोरिक्षा या निवडणुकीत उतरले होते,

हिंगोली मतदारसंघातून आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या कुटुंबातील सौ. राजामती मुटकुळे या कपबशी या निवडणूक चिन्हावर विजयी झाल्या आहेत.रमेश शिंदे हे छत्री व गुलाबराव सरकटे हे कपाट या चिन्हावर रिंगणात उतरले होते.ते दोघे पराभूत झाले. वसमत मतदारसंघातून तुषार जाधव हे अंगठी आणि आ.चंद्रकांत नवघरे हे कपबशी या निवडणूक चिन्हावर उभे होते.येथून आमदार नवघरे हे विजय झाले आहेत.



कळमनुरी मतदारसंघातून अभय सावंत हे विजयी झाले. दत्तराव कदम यांना कपाट व बालासाहेब मगर यांना छताचा पंखा हे चिन्ह मिळाले होते. इतर शेती संस्था गटातून आ.खान सय्यद शेरगुल खान यांना छत्री, प्रीती जाधव यांना जग, विजय जामकर यांना कपबशी, विजयकुमार मोरे यांना मोबाईल आणि सय्यद हरसान हुसैनी यांना चष्मा हे चिन्हावर निवडणूक रिंगणात उतरले होते. या गटात अपेक्षेप्रमाणे आ.सईद खान व जामकर यांच्यात तूल्यबळ लढत झाली, त्या लढतीतून आ.खान हे अल्पशा म्हणजे तीन मतांच्या फरकाने विजयी झाले आहेत. अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून प्रशास ठाकूर यांना अंगठी, शोभा बोबडे यांना कपबशी, तुकाराम रुमाले यांना ट्रॅक्टर, यशवंतराव वाटोड यांना शिटी, अतुल सरोदे यांना छत्री आणि संजय सारणीकर यांना हेलिकॉप्टर हे चिन्ह देण्यात आले.येथून बहूरंगी लढतीत श्रीमती बोबडे या विजयी झाल्या.

विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग मतदारसंघातील उमेदवार अभय कुंडगीर यांना खटारा, स्वराजसिंह परिहार यांना छत्री, सुनंदा फुलके यांना शिटी, दत्तात्रय मायंदळे यांना कपबशी आणि बळीराम सोरेकर यांना शिवणयंत्र हे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे.

येथून बँकेचे विद्यमान संचालक दत्तात्रय मायदंळे विजय झाले. असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारीयांनी दै.तरुण भारतशी बोलताना दिली आहे.

**उमेदवारांना मिळालेली मते:**
**प्राथमिक कृषी पतपुरवठा**

**मानवत गट -**
अमोल कदम १५
आकाश चोखट २०
..........

**पूर्णा गट-**
डाखोरे नंदकुमार ३४
तुळशीराम बोबडे २८
........

**हिंगोली गट:**
मुटकुळे राजामती ५९
शिंदे रमेश विठ्ठलराव ३१
सरकटे गुलाबराव ००
एकूण मत ९०
........

**कळमनुरी गट :**
अभय सावंत-३५
कदम -१२
बाळासाहेब मगर-३



**वसमत गट -**
नवघरे चंद्रकांत -५८
तुषार जाधव- २०
.........

सईद खान -२९०
विजय जामकर- २८७
........

परिहार स्वराजसिंह -३४८
सुनंदा फलके -९
दत्तात्रय माईंदळे -१०६६
बळीराम सोरेकर- ३
कुंडगिर-५......

ठाकूर प्रशास -१२
बोबडे शोभा- १२१६
सरोदे अतुल -१७६
संजय सारणीकर -३

## संक्षिप्त वृत्त...

### बाबुलतार येथील तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** पावसाने दिलेल्या मोठ्या खंडामुळे निर्माण झालेले दुबार पेरणीचे संकट, वाढता शेती खर्च आणि कर्जाच्या विवंचनेत असलेल्या पाथरी तालुक्यातील बाबुलतार येथील एका तरुण शेतकऱ्याने शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि. १७) उघडकीस आली.

मृत शेतकऱ्याचे नाव ऋषिकेश भगवान जोगदंड (वय २७) असे आहे. त्यांच्याकडे तीन एकर स्वतःची तर अडीच एकर बटाईची शेती होती. शेती हा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार होता. यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला झालेल्या पावसानंतर दीर्घ खंड पडल्याने पिकांची वाढ खुंटली असून दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे आधीच वाढलेल्या शेतीखर्चात आणखी भर पडणार असल्याची चिंता त्यांना सतावत होती. कर्जबाजारीपणामुळे आर्थिक ताण वाढला होता. शेतीसाठी घेतलेले कर्ज आणि उत्पन्नाबाबतची अनिश्चितता यामुळे ते मानसिक तणावाखाली असल्याचे सांगण्यात येत आहे. या विवंचनेतून त्यांनी शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन जीवनयात्रा संपविल्याची माहिती समोर आली आहे.

ऋषिकेश जोगदंड यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबाच्या आधारस्तंभाचे अकाली निधन झाल्याने गावात शोककळा पसरली असून शेतकरी वर्गातूनही तीव्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे धरणे आंदोलन : विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने शनिवारी येथील उपोषण मैदानावर धरणे आंदोलन करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष राधाजी शेळके यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन 'संघर्ष दिन' म्हणून घोषित करावा, मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण द्यावे, अण्णाभाऊ साठे व क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी जाहीर करावी तसेच दोघांनाही मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. याशिवाय क्रांतिवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या शिफारशी तातडीने लागू कराव्यात, परभणी शहरात क्रांतिवीर लहुजी साळवे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा, अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरातील अतिक्रमणे हटवून परिसराचे सुशोभीकरण करावे तसेच छत्रपती संभाजीनगर विमानतळाला क्रांतिवीर लहुजी साळवे यांचे नाव द्यावे, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. गायरान जमीनधारकांना मालकी हक्क देणे, राज्यातील झोपडपट्टीधारकांना पक्की घरे उपलब्ध करून देणे, दलित समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमीची व्यवस्था करणे, मातंग समाजासाठी गाव तिथे समाजमंदिर उभारणे तसेच अण्णाभाऊ साठे आणि क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या कार्याचा शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समावेश करावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

### एरंडेश्वरमध्ये शेतकऱ्याची साडेपाच कोटींची फसवणूक

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील एरंडेश्वर येथे शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून तब्बल ६ हजार ८०० क्विंटल शेतमाल खरेदी केल्यानंतर त्याचे ५ कोटी ५६ लाख ४९ हजार ३०० रुपये न देता व्यापारी फरार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे एरंडेश्वरसह परिसरातील शेतकरी संतप्त झाले असून पूर्णा पोलिस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एरंडेश्वर हे शेतीप्रधान गाव म्हणून ओळखले जाते. येथील शेख हमीद शेख बालेसाब आणि शेख सरू शेख बालेसाब हे गेल्या काही वर्षांपासून परिसरातील शेतकऱ्यांकडून भुसार माल खरेदीचा व्यवसाय करत होते. सुरुवातीच्या व्यवहारांमध्ये वेळेवर पैसे देत त्यांनी शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला होता. त्यामुळे अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणावर त्यांच्याकडे शेतमाल विक्री करू लागले.



## श्री सिद्धेश्वर मंदिर विकासासाठी भोंबे यांची ₹४.२१ लाखांची देणगी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** येथील पुरातन काळातील श्री सिद्धेश्वर मंदिराच्या विकासासाठी सामाजिक बांधिलकी जपत उद्योजक व समाजसेवक सुनील भोंबे पाटील यांनी ₹४ लाख २१ हजारांची देणगी धनादेशाद्वारे मंदिर समितीकडे सुपूर्द केली. या उदात्त योगदानाबद्दल मंदिर समितीतर्फे त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळीकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागोराव जाधव होते.

प्रमुख उपस्थितीत ॲड. विजयराव देशमुख, ज्ञानोपासक महाविद्यालयाची प्राचार्य श्री भोंबे सरनगराध्यक्ष प्रताप देशमुख, नगर सेवक गोपाळ रोकडे, डॉ. दुर्गादास कानडकर, दत्तराव गाडेकर व गंगाप्रसाद घुगे, प.स. अध्यक्ष किशोर खिस्ते, यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत सुनील भोंबे पाटील यांनी मंदिर विकासासाठीचा धनादेश मंदिर समितीकडे सुपूर्द केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. विजयराव देशमुख यांनी केले. यावेळी नागोराव जाधव व नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी मनोगत व्यक्त करत, श्री सिद्धेश्वर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी भाविक व दानशूर व्यक्तींनी अशाच प्रकारे पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

भाविकांच्या सहकार्यामुळे मंदिरासह परिसराचाही विकास साधता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार विष्णू गाडेकर यांनी मानले.कार्यक्रमास व्यापारी, मंदिर समितीचे सदस्य धनंजय जाधव , अनिल गाडेकर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी समन्वय ठेवून गावाचा विकास करावा- पालकमंत्री साकोरे बोर्डीकर

**जिंतूर,/प्रतिनिधी-** दिनांक १७ जुलै २०२६ रोजी माऊली मंगल कार्यालय जिंतूर येथे जिल्हा परिषद परभणी, पंचायत समिती जिंतूर द्वारा प्रत्येक गावाचा विकास व प्रगती साध्य करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे तालुकास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणाच्या उद्घाटन सोहळ्यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा पालकमंत्री परभणी मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांनी देशाचा व राज्याच्या विकासाचा पाया हा ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. असे उपस्थितांना संबोधित करताना सांगितले.




प्रत्येक ग्रामपंचायत निहाय ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्याशी संवाद साधला. सर्व ग्रामसेवकांनी आपल्या कर्तव्याप्रति तत्पर असले पाहिजे आणि गावातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सर्व सरपंच यांनी ग्रामसेवक यांच्याशी समन्वय ठेवून आपल्या गावाचा विकास व प्रगती करण्यासाठी कटिबद्ध राहिली पाहिजे.

याच कार्यक्रमात ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामाचा प्रत्यक्ष आढावा घेऊन आपल्यावर असणारे कर्तव्याची वेळेत पूर्तता करण्याबाबत सक्त सूचना दिल्या. उपस्थित असणाऱ्या नागरिकांच्या समस्या समजून घेऊन समस्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई विजयराव वाकळे, सभापती आयोध्याताई किशोर खिस्ते, नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख, उपसभापती सोनालीताई माधव दराडे, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र थिटे, डॉ देवराव कऱ्हाळे, रोहित चव्हाण, भगवानराव वटाणे, कृषी उत्पन्न बाजार समिती बोरीचे सभापती आत्माराम पवार, गटविकास अधिकारी सुभाष मानकर, सहाय्यक गटविकास अधिकारी भोसले, पंचायत समिती सदस्य भगवानराव जगताप, भास्करराव ठोंबरे, तेहसीन भाई, सरिता नागरे, पूजा ढोणे, वैष्णवी दाभाडे, रामेश्वर वजीर विस्तार अधिकारी श्री जाधव साहेब श्री ढोणे साहेब श्री इडोळे साहेब माधवराव दराडे किशोर खिस्ते नगरसेवक शुभेच्छा नगरसेवक प्रदीप चौधरी नगरसेवक पिंटू भाऊ चव्हाणयासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले.

## भव्य रक्तदान शिबिर, ५०० वृक्ष लागवड व श्री ओंकारेश्वर देवस्थान कार्यालय उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी-:** महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. आ. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या सूचनेनुसार भारतीय जनता पार्टी, परभणी महानगरच्या वतीने श्रीक्षेत्र त्रिधारा देवस्थान येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिर, ५०० वृक्ष लागवड, श्री ओंकारेश्वर देवस्थान (श्रीक्षेत्र त्रिधारा) कार्यालय उद्घाटन सोहळा तसेच देवस्थान परिसराची पाहणी हा सामाजिक उपक्रम मोठ्या उत्साहात व जनसहभागातून यशस्वीरित्या पार पडला.

या कार्यक्रमास पालकमंत्री मा. ना. सौ. मेघनादीदी बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते श्री ओंकारेश्वर देवस्थान, श्रीक्षेत्र त्रिधारा कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर श्री ओंकारेश्वर देवाची विधिवत पूजा व महाआरती करण्यात आली. तसेच देवस्थान परिसराची पाहणी करून विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजक श्रीक्षेत्र त्रिधारा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री शिवाजी भरोसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त, लोकप्रतिनिधी, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सामाजिक उपक्रमांतर्गत ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित मान्यवरांनी स्वतः वृक्षारोपण करून त्यांचे



संवर्धन करण्याचा संकल्प केला. त्याचबरोबर आयोजित भव्य रक्तदान शिबिरात शेकडो रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संरक्षण आणि मानवसेवेचा प्रेरणादायी संदेश समाजापर्यंत पोहोचला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच रक्तदाते आणि वृक्षारोपणात सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. ''रक्तदान हेच श्रेष्ठ दान वृक्षारोपण हेच भावी पिढीसाठी सर्वोत्तम योगदान.'' या संदेशाने संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला

## अग्रलेख

# कुरापती शेजारी !

घशाला कोरड पडत असल्याने आपले शेजारी बडे मियां पाकिस्तान आणि छोटे मियां बांगलादेश यांनी थयथयाट सुरू केला आहे. कारण आहे ते पाणी. जागतिक बँकेला भारत आणि पाकिस्तान यांच्यात सिंधू जलवाटप करार घडवून आणण्यासाठी तब्बल दहा वर्षे लागली होती. तो करार पहलगामच्या हल्ल्यानंतर मोदी सरकारने एका झटक्यात स्थगित केला. तोट्याचा असतानाही शेजारधर्म आणि माणुसकीच्या नात्याने भारताच्या तत्कालीन सरकारने हिमालयातून वाहत येणारे गोड आणि शुद्ध पाणी भविष्याचा फारसा विचार न करता पाकिस्तानच्या झोळीत टाकले होते. पाकिस्ताननंतर आता बांगलादेशनेही वळवळ सुरू केली आहे. तीस्ता नदीतील पाण्याबाबत भारताला विचारात न घेता बांगलादेशने चीनसोबत सामंजस्य करार केला आहे. हा करार अद्याप अधिकृत झाला नसल्याने त्यातील कलमे जाहीर करण्यात आली नाहीत. शेजारी देशांच्या प्रकरणात नाक खुपसण्याची सवय चीनला आहेच. या गोष्टीकडे भारत नैतिक-अनैतिकतेच्या चष्म्यातून पाहत असला तरी विश्वासघात करण्यात तरबेज असलेला चीन याकडे व्यावहारिक चष्म्यातून पाहतो. कसेही करून भारतावर दबाव आणण्याची चीनची रणनीती नेहमीच असते. पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार, बांगलादेशसोबत रस्ते बांधून भारताला भूमार्गाने घेरण्याचा प्रयत्न केल्यानंतर तीस्ता प्रकल्पाबाबत सामंजस्य करार करून चीनने मोठे आव्हान उभे केले आहे हे खरेच. पूर्वोत्तर भारतासाठी तीस्ता नदीचे मोठे महत्त्व आहे. तसेच बांगलादेशच्या उत्तर भागातील लक्षावधी नागरिकांसाच्या दृष्टीनेही तीस्ता नदीचे पाणी म्हणजे जीवन-मरणाचा प्रश्न आहे. एकूण ४१४ किलोमीटर लांब असलेल्या या नदीचा उगम सिक्कीममधील तीस्ता खांगत्से हिमनदीच्या परिसरात पोहुनरी शिखराजवळ असल्याचे मानले जाते. बांगलादेशात ब्रह्मपुत्रेला (यमुना) मिळण्यापूर्वी तीस्ताची भारतातील लांबी ३०९ किलोमीटर आहे. आज आपल्या दोन्ही शेजारी देशांमध्ये पाण्याची जी भीषण समस्या निर्माण झाली, त्याला भारत जबाबदार नाही. भारतापासून वेगळ्या झालेल्या पाकिस्तानने गेल्या ७९ वर्षांमध्ये पाणी अडविण्यासाठी काहीच उपाययोजना केल्या नाहीत. भारत म्हणजे भित्रा, नेभळट देश असून तो आपले काहीच वाकडे करू शकणार नाहीत, अशा आविर्भावात पाकिस्तान वावरत होता. भारतातून वाहून जाणाऱ्या पाण्यापैकी केवळ ३० दिवस पुरेल एवढेच पाणी साठवून ठेवण्याची क्षमता पाकिस्तानकडे आहे. उर्वरित सर्व पाणी अरबी समुद्रात वाहून जाते. सिंधू जल करार स्थगित केल्याने आणि पाकिस्तानकडे जाणाऱ्या नद्यांमधील पाणी अडविण्यास प्रारंभ केल्याने डोळे पांढरे होण्याची वेळ या नाठाळ शेजाऱ्यावर आली आहे. पंजाब आणि जम्मू-काश्मीरमधील जनतेचा विचार न करता तत्कालीन सरकारने सिंधू जल करारावर स्वाक्षरी केली होती. हा करार म्हणजे राज्यातील जनतेसोबत केलेला विश्वासघात होय, असे उद्गार जम्मू-काश्मीरचे तत्कालीन मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांनी अनेकदा काढले. इतिहासात केलेल्या चुका कधीही दुरुस्त केल्या जाऊ शकतात. सिंधू जलवाटप करार स्थगित करून मोदी सरकारने देशहिताचा निर्णय घेतला. २०१९ मध्ये ३७० कलम निष्प्रभ केल्यानंतर भारतासोबतचे सर्व संबंध तोडून टाकण्याचा जो निर्णय पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान इम्रान खान यांनी घेतला, त्याचे परिणाम आता जनता भोगत आहे. इम्रान खान यांच्या पावलावर पाऊल ठेवत बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांनी तीस्ता नदीच्या मुद्यावर भारताला विचारात न घेता चीनसोबत सामंजस्य करार केला आहे. या नदीच्या पाण्यावरून दोन्ही देशांत चार दशकांपासून वाद सुरू आहेत. १९८३ मध्ये दोन्ही देशांमध्ये पाणीवाटपाबाबत तात्पुरती सहमती झाली. ३९ टक्के पाणी भारताने तर ३६ टक्के बांगलादेशच्या वाट्याला आले. गेल्या चार दशकांमध्ये नदीचे पात्र आणि प्रवाहात बदल झाला. बांगलादेशमध्ये प्रवेश केल्यानंतर अनेक ठिकाणी नदी गाळामुळे उथळ झाली तर कुठे पात्र अरुंद झाले. परिणामी पावसाळ्यात पुराचा सामना करावा लागतो. दरम्यानच्या काळात भारताने सिक्कीम आणि पश्चिम बंगालमध्ये वीजप्रकल्प आणि सिंचनासाठी बंधारे बांधले. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध झाले. उन्हाळ्यात प्रवाह कमी होत असल्याने या काळात सिंचनासाठी नदीतील ५० टक्के पाणी देण्याची मागणी बांगलादेशने केली आहे. २०११ मध्ये काँग्रेसचे सरकार असताना दोन्ही देशांमध्ये करार जवळपास निश्चित झाला होता. ३७.५ टक्के पाणी बांगलादेशला तर ४२.५ टक्के भारताच्या वाट्याला येणार होते. हा करार उत्तर बंगालमधील शेतकऱ्यांच्या हिताला बाधा आणणारा असल्याचे सांगत तत्कालीन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कराराला विरोध केला. बंगालच्या उत्तर भागातील दार्जिलिंग, कलिम्पांग, जलपायगुडी, कुचबिहार, उत्तर दिनाजपूर आणि दक्षिण दिनाजपूर या जिल्ह्यांसाठी तीस्ता ही जीवनदायिनी आहे. शेती, उद्योग, पिण्याचे पाणी आणि जलविद्युत निर्मितीसाठी तीस्ता नदीच्या पाण्याचा उपयोग केला जातो. या नदीचे ८५ टक्के खोरे भारतात आहे. परिणामी, जास्तीत जास्त पाणी आम्हाला मिळावे, अशी रास्त मागणी सिक्कीम आणि बांगलादेशची आहे. हा केवळ पाण्याचा मुद्दा नव्हे; तर राजनैतिक, सुरक्षा आणि सामरिक दृष्टिकोनातूनही तीस्ता भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आंतरराष्ट्रीय सीमेपासून अवघ्या १० ते १२ आणि सिलिगुडी कॉरिडॉरपासून २२ किलोमीटर अंतरावर तीस्ता सिंचन प्रकल्प उभारला जाणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यास भारताच्या सीमेवरील जिल्ह्यांना बॅकवॉटरचा फटका बसण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प सिलिगुडी कॉरिडॉरजवळ असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील आहे. या भागातील चीनची दीर्घकालीन उपस्थिती भारतासाठी डोकेदुखी वाढविणारी ठरू शकते. भारताने यावर सावध प्रतिक्रिया व्यक्त करताना शेजारी देशांत सुरू असलेल्या घडामोडींवर लक्ष ठेवून असल्याचे म्हटले आहे. मोहम्मद युनूस यांच्या कार्यकाळात भारत-बांगलादेश यांच्यातील संबंधात निर्माण झालेला तणाव तारिक रहमान यांच्या तीस्ता प्रकल्पाबाबत घेतलेल्या निर्णयाने आणखीनच वाढला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर तारिक रहमान संबंध सुधारण्याचा एक भाग म्हणून भारताच्या दौऱ्यावर येतील, असे वाटत होते. पण, पाकिस्तानप्रमाणे बांगलादेशचेही चीनप्रेम उफाळून आल्याने भारताला सावध व्हावे लागणार आहे. रहमान भारताच्या दौऱ्यावर येणार नाहीत आणि याबाबत त्यांनी कधी वाच्यताही केली नाही, असे बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले. तीस्ताबाबत आमचा चीनसोबत सामंजस्य करार झाला असून, आम्ही संरक्षण करारही करणार असल्याचे स्पष्ट केले. ढाकाने घेतलेली ताठर भूमिका पाहता भविष्यात दोन्ही देशांचे संबंध कोणत्या वळणावर जाणार आहेत, हे स्पष्ट होते. भारतासोबत थेट पंगा घेण्याची पाकिस्तान अथवा बांगलादेशची कुवत नसल्याने चीनच्या काखेत बसून कुरापती करण्याचे उद्योग त्यांनी सुरू केले आहेत. नरेंद्र मोदींच्या रूपात कणखर आणि देशाच्या सुरक्षेविषयी जागरूक असलेले नेतृत्व सत्तेवर असल्याने आपली डाळ शिजणार नाही, याची कल्पना रहमान सरकारला आहे. पण या करारात चीनचे आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य घेऊन अप्रत्यक्षपणे भारतावर दबाव आणण्याचे बांगलादेशचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे भारताने भविष्यातील धोके ओळखून बांगलादेशसोबत संपर्क साधणे आवश्यक आहे. केवळ एकधर्मीय असल्याचा फायदा घेत पाकिस्तान आणि बांगलादेश हे शेजारी चीनची मदत घेऊन भारताला अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. पण, सिंधू जल वाटप करार स्थगित करून पाकिस्तानला ज्याप्रमाणे वठणीवर आणले, त्याचप्रमाणे तारिक रहमान यांना त्यांची जागा दाखवून देणे आवश्यक झाले आहे. तशी पावले उचलली जातील हे नक्की; तोवर कुरापती शेजाऱ्यांवर डोळ्यात तेल घालून नजर ठेवावी लागेल. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# संसदेचे पावसाळी अधिवेशन

पंतप्रधान, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्याराज्यांमधील मंत्री यांना एखाद्या प्रकरणात सलग ३० दिवस कारागृहात ठेवण्यात आल्यास ३१व्या दिवशी त्यांना पदमुक्त करणारे १३०वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या या पावसाळी अधिवेशनात पारित केले जाण्याची शक्यता आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन आजपासून सुरू होत असून, ते १३ ऑगस्टपर्यंत चालेल. या घटनादुरुस्ती विधेयकावर विचार करण्यासाठी संसदेची संयुक्त समिती अगोदरच नियुक्त करण्यात आली असून, समिती कोणत्या व कशा शिफारशी करते यावर विधेयकाचे भवितव्य बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे. विधेयक पारित झाल्यास अशा प्रकारचे ते जगातील पहिले उदाहरण असेल.

**कारण केजरीवाल ?** : या विधेयकाच्या मुळाशी आप नेते व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल व तामिळनाडूमधील एक माजी द्रमुक मंत्री बालाजी यांनी कारागृहात गेल्यावरही राजीनामा न देणे हे असल्याचे मानले जाते. केजरीवाल यांना दिल्लीत गाजलेला मद्य घोटाळ्यात अटक करण्यात आली होती. पण, तिहार कारागृहात गेल्यावरही त्यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता आणि त्यांना बरखास्त करण्याचा कोणताही अधिकार केंद्र सरकारजवळ नव्हता. भविष्यात अशी स्थिती उद्भवू नये यासाठी केंद्र सरकारने हे घटनादुरुस्ती विधेयक मांडण्याचा निर्णय घेतला असे समजते.

**एक काळ होता...** : देशाच्या राजकारणात एक काळ होता की, एखाद्या उच्च न्यायालयाने एखाद्या मुख्यमंत्र्याच्या वा मंत्र्याच्या विरोधात ताशेरे ओढले तरी तो मुख्यमंत्री वा मंत्री राजीनामा देत असे. महाराष्ट्राचे एक मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रहेमान अंतुले यांना सिमेंट घोटाळ्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यानंतर राजीनामा द्यावा लागला होता. नंतर मात्र न्यायालयांच्या ताशेऱ्यांची धार कमी होऊ लागली, न्यायालयांचा धाक कमी होऊ लागला. न्यायालयांच्या ताशेऱ्यानंतरही मंत्री आपापल्या पदांवर सन्मानाने राहू लागले.

**मुख्यमंत्री कारागृहात** : मुख्यमंत्र्यांनी कारागृहात जाण्याची स्थिती अलिकडच्या काळात सुरू झाली. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना कारागृहात जावे लागले. मात्र, कारागृहात जाण्यापूर्वी त्यांनी राजकीय प्रगल्भता दाखवीत राजीनामा दिला व नंतर ते कारागृहात गेले. केजरीवाल यांनी ती राजकीय परिपक्वता दाखविली नाही. लालूप्रसाद यादव कारागृहात गेले. तेथे जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या पत्नीस- राबडीदेवीस- मुख्यमंत्री केले. केजरीवाल यांनीही असा विचार केला होता असे समजते. पण, पक्षात व जनतेत आपल्या प्रतिमेला धक्का बसेल या भीतिपोटी त्यांनी राजीनामा न देता कारागृहात जाणे पसंत केले. पण, याने त्यांची अधिक बदनामी झाली. केजरीवाल जवळपास ५ महिने तिहार कारागृहात होते. तेथून त्यांनी सरकार चालविले. म्हणजे या काळात सरकारी कामकाज पूर्णपणे ठप्प होते. दिल्लीत तसेही प्रमुख अधिकार नायब राज्यपालांना देण्यात आले असल्याने लोकनिर्वाचित सरकारला फारसे अधिकार नाहीत. पण, जे काही लंगडे-लुळे सरकार आहे तेही कारागृहात बंदिस्त होते. त्यातूनच या विधेयकाचा जन्म झाला असे समजते. मात्र नंतर संबंधित प्रकरणात न्यायालयाने- त्या मुख्यमंत्र्यास - मंत्र्यास निर्दोष ठरविले तर काय, असा प्रश्न विधेयक सादर केला जाण्यापूर्वीच विचारला जात आहे आणि तो उचितही आहे. सरकारनेही याचा पुरेसा विचार केला असावा असे समजण्यास हरकत नाही.

**१३१ वे घटनादुरुस्ती विधेयक** : खासदारांची संख्या वाढविणे, त्यांच्या मतदारसंघाचे परिसीमन, महिला आरक्षण या संबंधीचे १३१वे घटनादुरुस्ती विधेयक या अधिवेशनात पुन्हा मांडले जाईल असे समजते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात ते मांडण्यात आले होते. पण, दोन्ही सभागृहांत सरकारजवळ दोन तृतीयांश बहुमत नसल्याने ते पारित करता आले नव्हते. पण, आता तृणमूल काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, आम आदमी पार्टी यांच्यात फूट पडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने या विधेयकास पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा स्थितीत सरकारला आता हे विधेयक पारित करवून घेण्यास साहाय्य होईल असे मानले जाते.

मात्र, विधेयक पारित झाल्यावरही सरकारला एका समस्येचा सामना करावा लागणार आहे. ही समस्या कायदेशीर- घटनात्मक राहणार आहे. पक्षफुटीची काही प्रकरणे अगोदरच न्यायालयात आहेत. आणखी प्रकरणे न्यायालयात जाणार आहेत. त्यांचा निवाडा-निकाल लागण्यापूर्वी या खासदारांचे मतदान-'वैध' मानून विधेयक पारित केल्यास, पण, नंतर ही पक्षफूट अवैध ठरल्यास सारेच समीकरण गडबडण्याची शक्यता आहे. राजकारणात व कायदा तयार करताना या सर्व बाबींचा फार काळजीपूर्वक विचार करावा लागतो व सरकारकडून तो केला जाईल असे समजण्यास हरकत नाही.

**चर्चा होईल काय ?** : अशा या दोन महत्त्वाच्या व दूरगामी परिणाम करणाऱ्या घटनादुरुस्ती विधेयकांवर संसदेच्या दोन्ही सभागृहांत व्यापक विस्तृत चर्चा होणे अपेक्षित आहे. मात्र, मागील काही अधिवेशनांचे स्वरूप पाहता यावर एक मोठे प्रश्नचिन्ह आहे असे म्हणता येईल. संसदेतील गंभीर चर्चा- दर्जेदार भाषणे हा भाग आता इतिहासजमा झाला आहे. विरोधी पक्षांनी संसदेचे कामकाज चालू द्यावे व त्यांनी सभागृहात आपली भूमिका प्रभावीपणे मांडावी असे अभिप्रेत आहे आणि सरकारी पक्षानेही विरोधी पक्षांच्या भावना विचारात घेत त्यांना बोलण्याची पूर्ण संधी द्यावी हेही अपेक्षित आहे. पण, सध्या विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्यातील संबंध कमालीचे ताणले गेलेले आहेत. यात दोन्ही पक्षांनी जवळ येणे, एकत्र येणे जवळपास अशक्य असल्याचे मानले जाते.

**नवे सभागृह ?** : खासदारांची संख्या वाढल्यास या सर्व खासदारांना सामावून घेण्याची क्षमता विद्यमान संसद भवनात नाही. सांसदीय परंपरेनुसार दरवर्षी होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा प्रारंभ दोन्ही सभागृहांसमोर राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होत असतो. लोकसभा व राज्यसभा यांची सदस्यसंख्या वाढल्यानंतर संयुक्त बैठक कुठे होणार हा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यासाठी तिसरे संसद भवन बांधावे लागेल असे करण्यापेक्षा राष्ट्रपतींनी लोकसभा भरणाऱ्या सभागृहात येऊन भाषण द्यावे व राज्यसभा सदस्यांनी ते आपल्या सभागृहात म्हणजे राज्यसभेत बसून ऐकावे असा एक पर्याय काढला जाऊ शकतो. अर्थात ही समस्या लोकसभा निवडणुकीनंतर उद्भवणार आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर लोकसभा खासदारांची संख्या वाढलेली असेल तर राज्यसभा खासदारांची संख्या वाढण्यास नंतर काही वर्षे लागतील. राज्यसभेच्या नियमानुसार एक तृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होत असतात व नवे सदस्य निवडले जात असतात म्हणजे नव्या विधेयकानुसार राज्यसभा खासदारांची संख्या वाढल्यास २०२९ नंतर ६ वर्षे लागतील.

**आणखी काही मुद्दे** : पावसाळी अधिवेशनात जंतर-मंतरवर सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन, सोनम वांगचुकांचे उपोषण हे मुद्दे उपस्थित केले जातील, असे समजते. ऑपरेशन सिंदूरबाबत संरक्षण मंत्री राजनाथसिंग यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव आणण्याची तयारी विरोधी पक्षांनी चालविली असल्याचे समजते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान एकही भारतीय जवान हुतात्मा झाला नसल्याचे विधान राजनाथसिंगांनी केले होते, असा विरोधी पक्षांचा दावा आहे आणि आता ६ भारतीय जवान हुतात्मा झाल्याची बाब भारत सरकारने मान्य केली आहे. त्यामुळे राजनाथसिंगांनी चुकीची माहिती देत संसदेची दिशाभूल केली असा विरोधी पक्षांचा आरोप आहे. राजनाथसिंगांनी याचा अगोदरच इन्कार केला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी राजनाथसिंगांच्या विरोधात आणलेल्या हक्कभंग प्रस्तावास फार महत्त्व दिले जात नाही.

संसद सुरू असताना घडलेल्या घटनांचे साद-पडसाद सभागृहांत उमटत असतात. याने कधी कधी संपूर्ण अधिवेशनाची दिशाही बदलून जाते असाही इतिहास आहे. अशा घटनांबाबत सरकार काहीच करू शकत नाही, ही वस्तुस्थिती असते. मात्र, १३० व १३१ क्रमांकाची दोन घटनादुरुस्ती विधेयके येणाऱ्या काळात अतिशय महत्त्वाची ठरतील यात शंकाच नाही. ■

## वेध

**हेमंत सालोडकर**

# सुविधांचा सुकाळ संस्कारांचा दुष्काळ

लोकांना कोणतीही गोष्ट फुकट मिळण्याची सवय झाली की तिचे मोल राहात नाही. सार्वजनिक वस्तूंचा वापर कसा करायचा, त्याचे नुकसान होऊ नये याची काळजी घेण्याची जबाबदारी सरकारसोबतच नागरिकांचीही आहे. सार्वजनिक मालमत्ता म्हणजे सरकारने नागरिकांच्या करातून उभारलेल्या त्या सुविधा, ज्यांचा वापर प्रत्येक नागरिक करतो. रस्ते, पदपथ, वाचनालये, क्रीडा मैदाने, उद्याने, बसथांबे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पथदिवे, विजेचे खांब, पोलिस बुथ, सार्वजनिक ठिकाणी असलेले स्टील डस्टबिन, ग्रीन जिम, कियॉस्क मशिन्स, थोर पुरुषांचे पुतळे अशा सर्व गोष्टींची काळजी घेणे, त्यांचा उपयोग करणे नागरिकांचे कर्तव्य आहे. या मालमत्तेचे जतन करणे ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचीही जबाबदारी आहे. मोठ्या शहरांमध्ये या सुविधा असतात. त्याचा उपयोग सुजाण नागरिक करतात, पण काही समाजकंटकांच्या उपद्रवामुळे या वस्तूंचे नुकसान होते.

अनेक ठिकाणच्या सार्वजनिक वाचनालयांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. वाचनालयांतील पुस्तके फाडणे किंवा चोरीला जाणे, अस्वच्छता यामुळे तेथे जाण्यास अनेक जण टाळतात. अनेक गरीब मुले वाचनालयात अभ्यास करायला जातात. पण तेथील अव्यवस्था पाहून त्यांच्या पदरी निराशा पडते. जेथे ज्ञान ग्रहण करायचे ती जागा स्वच्छ असावी, वातावरण प्रसन्न असावे. पण काही नागरिकांच्या वागण्यामुळे वातावरण गढूळ होते. क्रीडा मैदानांचीही यापेक्षा वेगळी स्थिती नाही. साहित्याची तोडफोड, तुटलेली बाके, व्यायामाची साधने मोडलेली असतात. अनेक ठिकाणी ग्रीम जिम उभारण्यात आले आहेत. नव्याचे नऊ दिवस म्हणून त्यांची देखरेख ठेवली जाते. पण काही दिवसांतच ती तुटलेली असतात. रस्त्याच्या बाजूला अनेक ठिकाणी स्टीलचे डस्टबिन असतात.

काही दिवसांनी त्यापैकी काहीच शिल्लक असतात. बाकीचे चोरीला जातात. तेथे फक्त त्यांचे खांब उभे असतात. यासह शहर स्वच्छ असावे म्हणून फायबर स्वच्छतागृहे असतात. त्यातील साहित्यही चोरीला जाणे, पाण्याच्या टाक्या चोरीला जाणे असे प्रकार आढळून येतात. पदपथावर अतिक्रमण, रस्त्यावरील पुतळे अस्वच्छ, कियॉस्क मशिन्सची दुरवस्था हे नेहमीचेच झाले आहे. काही दिवसांपूर्वी वाहतूक पोलिसांसाठी चौकाचौकात बुथ ठेवले होते. पण मोजक्याच बुथचा वापर केला जातो. इतर बुथ केवळ शोभेचे ठरले आहेत. आता युद्धसुद्धा मानवरहित होत असताना, वाहनचालकांवर नजर ठेवण्यासाठी पोलिसांची गरज उरली नाही. अत्याधुनिक कॅमेरे ठिकठिकाणी असतील आणि नागरिकांना वाहतूक नियम पाळण्याचे संस्कार असतील तर वाहतूक पोलिसांचीही गरज उरणार नाही आणि बुथचीही आवश्यकता राहणार नाही. या समस्या केवळ महानगरांसाठी मर्यादित नाही.

सार्वजनिक वस्तूंचे नुकसान म्हणजे आपले नुकसान आहे, याची जाणीव नागरिकांना केवळ सामूहिक संस्कारांतूनच होऊ शकते. नागरिकांच्या कुरापतखोर वागणुकीमुळे सरकारला एकाच गोष्टीवर वारंवार पैसे खर्च करावे लागतात. तो पैसा इतर विकास कामांवर खर्च करता येत नाही. या गोष्टी टाळायच्या असतील तर प्रत्येक सुविधेसाठी नागरिकांकडून शुल्क आकारणे गरजेचे आहे. भुर्दंड बसल्यावर लोकांना सार्वजनिक संस्कारांची जाणीव होईल. यासाठी प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणासाठी विशेष पथके, सुजाण नागरिक घडविण्यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे. मात्र, केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी नाही, नागरिकांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. परिसरातील सार्वजनिक मालमत्तेच्या देखभालीसाठी स्वयंसेवी उपक्रम राबवावेत. मुलांना उद्याने, वाचनालये आणि सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळण्याची सवय लावणे आवश्यक आहे. सार्वजनिक वस्तू वापरण्याचे संस्कार रुजले, तर मोफत सेवा टिकतील, सार्वजनिक खर्च कमी होईल आणि विकासकामांसाठी अधिक निधी उपलब्ध होईल. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सुजाण नागरिकत्वाची खरी ओळख आहे. ■

९८५०७५३२८१

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# श्रद्धेचे दृढीकरण आणि व्यवस्थेचे शुद्धीकरण

रामजन्मभूमीवर प्रभू श्रीरामांचे भव्य मंदिर उभे राहावे, ही केवळ भारतातील नव्हे तर जगभरातील कोट्यवधी रामभक्तांची शतकानुशतके जपलेली इच्छा होती. अनेक पिढ्यांच्या संघर्ष, त्याग आणि प्रतीक्षेनंतर अयोध्येत उभे राहिलेले श्रीराम मंदिर हे भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक बनले आहे.

प्रभू श्रीराम हे मर्यादा पुरुषोत्तम म्हणून ओळखले जातात. आदर्श पुत्र, आदर्श भाऊ, आदर्श पती, आदर्श राजा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सत्य व धर्मासाठी सर्वस्वाचा त्याग करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे स्मरण केले जाते. म्हणूनच आजही आपण अभिमानाने म्हणतो-

**रघुकुल रीति सदा चली आई, प्राण जाई पर वचन न जाई.**

अशा सत्यनिष्ठ परंपरेचे प्रतीक असलेल्या श्रीरामांच्या मंदिराशी संबंधित देणग्यांच्या व्यवस्थापनाबाबत काही अनियमिततेचे आरोप समोर आल्याने अनेक रामभक्तांच्या मनात वेदना निर्माण होणे स्वाभाविक आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असून संबंधित यंत्रणा आणि न्यायव्यवस्था आपले काम करत आहेत. दोषी कोणी असेल तर त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी आणि निरपराध व्यक्तीवर अन्याय होऊ नये, हीच प्रत्येक रामभक्ताची अपेक्षा आहे. मात्र या घटनेच्या निमित्ताने काही राजकीय आणि वैचारिक वादही निर्माण झालेत. काहींनी या आरोपांच्या आधारे संपूर्ण राम मंदिर, ट्रस्ट किंवा हिंदू समाजावर प्रश्नचिन्ह उभे करण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही एका व्यक्तीच्या किंवा काही व्यक्तींच्या कथित चुकीचा ठपका संपूर्ण संस्थेवर किंवा समाजावर ठेवणे योग्य नाही. वास्तविक पाहता देणगी स्वरूपात आलेली धनराशी मोजणे व त्याचे योग्य व्यवस्थापन करणे याच्याबद्दलचा करार बँक ऑफ इंडिया सोबत झालेला होता. जे लोक अटकेमध्ये आहेत त्यातही त्यांचेच कर्मचारी आहेत. ज्या प्रकारे एखाद्या सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचारामुळे संपूर्ण शासन भ्रष्ट ठरत नाही, त्याचप्रमाणे एखाद्या धार्मिक संस्थेतील कथित अनियमिततेमुळे श्रद्धेचे मूल्य कमी होत नाही. तसेच गैरव्यवहार झाला या घटनेचेही अवमूल्यन व्हायला नको.

या देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे, समाजघटकाचे, राजकीय पक्षांचे आणि विविध संघटनांचे काही ना काही हितसंबंध असतात. अनेकदा त्या हितसंबंधांच्या दृष्टीनेच त्यांची भूमिका निश्चित होत असते. राम मंदिराच्या प्रश्नातही हेच चित्र दिसून आले. काही राजकीय नेत्यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थिती लावली, तर काहींनी त्यापासून जाणीवपूर्वक दूर राहण्याचा निर्णय घेतला. काहींनी या कार्यक्रमावर टीका केली, तर काहींनी त्याचे मनापासून स्वागत केले. काहींना राम मंदिराची उभारणीच मान्य नव्हती; काहींनी त्या जागेचा इस्पितळासारख्या अन्य कारणांसाठी उपयोग व्हावा, अशी भूमिका मांडली. तर काहींच्या राजकीय भूमिकेवरून असे जाणवले की, हा प्रश्न कायम प्रलंबित राहिला असता तर त्यातून त्यांना राजकीय लाभ मिळाला असता.

काही लोकांनी राम मंदिराच्या निर्माणाला मोदींचा किंवा भाजपाचा विजय मानले. राम मंदिर हे जागतिक आस्थेचे केंद्र आहे या सत्यतेची त्यांच्या मनाला पुसटशी जाणीवही कधी झाली नाही. राम मंदिर हा त्यांच्यासाठी संघ परिवाराचा मुद्दा होता. ज्या वेळेला राम मंदिरासाठी संपूर्ण देशभरातून एक एक रुपया गोळा करण्यात आला त्याही वेळेला तो पैसा कुठे गेला, त्याचे काय झाले असे प्रश्न विचारणारे होते. असे प्रश्न विचारणाऱ्यांचा त्याही वेळचा उद्देश पैशांचा हिशेब विचारणे हा नव्हता तर संघ परिवाराला बदनाम कसे करता येईल हाच त्यांचा मुख्य उद्देश होता.

प्रभू श्रीरामांवर श्रद्धा असलेला सामान्य माणूस कालही आपल्या कष्टाच्या कमाईतील काही भाग मंदिरासाठी अर्पण करत होता आणि आजही करतो. तो दान करताना व्यवहार करत नाही; तो श्रद्धा व्यक्त करत असतो. त्या श्रद्धेचे संरक्षण करणे ही ट्रस्ट, व्यवस्थापन आणि समाज या सर्वांची संयुक्त जबाबदारी आहे. जेव्हा हा वाद उभा राहिला, तेव्हा समाजातील अनेक जण पुढे आले. त्यांनी आपण राम मंदिरासाठी दान दिलेल्या वस्तूंची नावे आणि यादी जाहीरपणे सांगितली. आम्ही हे दिले होते, आम्ही ते दिले होते, असे अनेकांनी सांगितले. परंतु सनातन धर्मानुसार दानाचे आदर्श तत्त्व असे आहे की, दान दिल्यानंतर आपण काय दिले याचे स्मरणही राहू नये. इतकेच नव्हे, तर मी दान दिले आहे हा अहंभावसुद्धा मनात राहू नये. निःस्वार्थ भावनेने, कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता केलेले दान हेच सनातन धर्माने श्रेष्ठ मानले आहे.

आज आवश्यकता आहे ती दोन गोष्टींची, एक श्रद्धेचे दृढीकरण आणि दुसरे म्हणजे व्यवस्थेचे शुद्धीकरण. श्रद्धा अबाधित राहिली पाहिजे आणि व्यवस्थेतील त्रुटी निर्धाराने दूर केल्या पाहिजेत. राम मंदिर हे केवळ दगडांचे बांधकाम नाही; ते कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धेचे, संघर्षाचे आणि सांस्कृतिक स्मृतींचे प्रतीक आहे. त्यामुळे मंदिराची प्रतिष्ठा जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.


प्रभू श्रीरामांनी आपल्या जीवनातून सत्य, न्याय, मर्यादा आणि उत्तरदायित्वाचा आदर्श घालून दिला. त्या आदर्शांनुसारच मंदिर व्यवस्थापनानेही स्वतःला अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकविश्वासास पात्र बनविले, तर ही घटना भविष्यासाठी एक महत्त्वाचा धडा ठरेल. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### गुरूच शिष्याच्या उन्नतीचे खरे मार्गदर्शक



मनुष्यजन्माचे खरे सार्थक कशात आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न आज फार कमी लोक करतात. बहुतेक प्रत्येक जण बाह्य जगाच्या आकर्षणात रमून गेलेला दिसतो, परंतु खरा, शाश्वत आनंद हा गुरूंच्या चरणीच मिळतो. गुरूंचा सहवास मनुष्याला केवळ समाधान देत नाही, तर त्याला मोक्षप्राप्तीच्या मार्गावरही नेतो. मनुष्यजन्म मिळणे, गुरूंची भेट होणे आणि त्यांना ओळखून त्यांच्या सान्निध्यात राहणे तिन्ही गोष्टी अत्यंत दुर्मिळ आहेत.

गुरू शोधायचे नसतात, उलट योग्य वेळी गुरूच आपल्या जीवनात येतात. गुरू म्हणजे शिष्याचे खरे हित जाणणारे, सुख-दुःखात समत्व कसे राखावे हे शिकवणारे आणि त्याच्या आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारे. गुरू शिष्याच्या मनातील इच्छा-आकांक्षा हळूहळू नष्ट करतात. गोंदवलेकर महाराज यांचे उदाहरण यासाठी अत्यंत मार्मिक आहे.

गाडी रोज काशीला जाते, पण तिला विश्वेश्वराचे दर्शन होत नाही, दर्शन होते ते त्या गाडीत बसलेल्या प्रवाशांना. त्याचप्रमाणे, गुरूंच्या सान्निध्यात राहून त्यांच्या उपदेशाचे आचरण करणाऱ्यालाच त्याचा खरा लाभ मिळतो. गुरू शिष्याला स्वतःसारखे बनवतात. सदाचारी आणि शुद्ध आचरण करणाऱ्या व्यक्तीच्या देहावर एक प्रकारचे तेज दिसते, परंतु सत्पुरुषांचे वैशिष्ट्य वेगळे असते. त्यांचे अंतःकरण भगवंताच्या भक्तीने व्यापलेले असते. या जगातील देहाधिष्ठित सुखांचे मार्ग आपण अधिक जाणतो, परंतु देहाच्या पलीकडे असलेले, चिरंतन आणि खरे सुख भगवंताशी एकरूप होण्याचे सुख हे केवळ गुरुकृपेनेच समजू शकते. म्हणून आध्यात्मिक प्रगतीसाठी गुरुकृपा होणे आवश्यक आहे

गोंदवलेकर महाराज म्हणतात, आगगाडीत बसलेले सर्व प्रवासी शेवटच्या स्थानकापर्यंत पोहोचतात, त्याचप्रमाणे, गुरूंचे आज्ञापालन करणारे सर्व जण भगवंतापर्यंत पोहोचतात. सदोष, पापी किंवा अयोग्य वाटणारे लोकही गुरुकृपेने तरून जाऊ शकतात. जसे वाल्या कोळी लुटारू होता परंतु भक्तीमुळे, साधनेमुळे आणि गुरुकृपेमुळे त्याचे जीवन ऋषितुल्य झाले आणि पुढे वाल्मीकि ऋषी झाले.

**रमा देशमुख**/नागपूर

■■■

### अव्याहत प्रयत्न गरजेचे

१८ जुलैच्या मागोवा पुरवणीत व्याप्त काश्मीरसंदर्भातील प्रफुल्ल केतकरांचा लेख वाचनीय आहेच. या विषयावर आणखीन सखोल व विस्तृत आणि अभ्यासपूर्ण चर्चा होणे गरजेचे आहे, असे मला वाटते. सरकार युनोत या प्रश्नावर आवाज उठवून मानवी स्वातंत्र्यावर पाक लष्कर कसा भयानक अत्याचार करीत आहे, हे जगाला दाखवले पाहिजे. पूर्वीच्या सरकारच्या मूर्खपणामुळे पाकने बळकावलेला आपला भूभाग परत मिळविण्यासाठी अव्याहत प्रयत्न व्हायलाच पाहिजे, असे मनापासून वाटते. यानिमित्ताने केतकरांची उचललेला मुद्दा विचारात घेऊन यावर चर्चा घडवून आणावी, एवढेच.

**किशोर आपटे**/खराडी, पुणे। ७८८८१६४४७१

■■■

### पांदण रस्त्यांसाठी आशेचा किरण

१५ जुलै २०२६ ला महसूल व वन विभागामार्फत मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेअंतर्गत एक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यात विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या कामकाजात मदतीसाठी सह-अध्यक्षाच्या नेमणुकीची व्यवस्था आहे. या आधीसुद्धा प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक शासन निर्णय अस्तित्वात आहेत, अनेकदा समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. पालकमंत्री शेत पांदण रस्ते योजना (२०१८), मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पांदण रस्ते योजना (२०२१) घोषित करण्यात आल्या होत्या. तसेच मनरेगा आणि रोजगार हमी योजनेच्या माध्यमातूनही यासाठी प्रयत्न झालेत. परंतु या सर्व योजना फारशा यशस्वी झाल्या नाहीत कारण प्रशासकीय अनास्था, निधीचा अभाव, योग्य साहित्य व यंत्रसामुग्री प्रस्तावित नसणे, शेतकऱ्यांकडूनही अतिक्रमणे व असहकार्य वगैरे. आजही अनेक शेत रस्ते शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी योग्य नाही. पावसाळ्यात शेतात पायी जाण्याचीही सोय नसते तर ट्रॅक्टरद्वारे यांत्रिक शेतीचे स्वप्न तर फार दूर आहे. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी, स्थानिक पातळीवर समन्वय व देखरेख करण्यासाठी, भेदभाव टाळण्यासाठी सह-अध्यक्षांच्या नेमणुका करण्यात आल्याने शेत रस्त्यांसाठी एक नवीन आशा निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या या प्रश्नाला गती मिळेल आणि योग्य तो निधी अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध होईल अशी आशा करू या. ■

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अंबाजोगाई तालुक्यातील भावठाणा गावात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या
## दारूच्या व्यसनाची प्राथमिक माहिती



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील भावठाणा येथे २८ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली असून,या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय श्रीकिसन जाधव (वय २८, रा. भावठाणा, ता. अंबाजोगाई, जि. बीड) यांनी १८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ८.०५ वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरी पंख्याच्या हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला.

घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी त्यांना तातडीने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. पोलीस नोंदीनुसार, मृत तरुणाला दारूचे व्यसन असल्याचे तसेच तो अनेकदा दारूच्या नशेत राहत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र, दारूचे व्यसन आणि आत्महत्येचा थेट संबंध असल्याचे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस अंमलदार भोसले करीत आहेत.

# माजलगावच्या संस्थेचे पाकिस्तान कनेक्शन उघड!

माजलगाव -गुलजार ए रजा या ट्रस्टने माजलगाव येथील एका संस्थेच्या वेगवेगळ्या अकाउंट वर तब्बल 4 कोटी 73 लाख रुपये देणगी जमा केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एवढी मोठी रक्कम जमा करणाऱ्या संस्थेचे पाकिस्तान मधील दावत ए इस्लामी या संस्थेशी संबंध असल्याचे उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यामुळे आता माजलगाव येथील संस्था देखील संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

दहशतवाद विरोधी पथकाच्या तपासात एक अत्यंत खळबळजनक माहिती समोर आली आहे. पाकिस्तानच्या वादग्रस्त 'दावत-ए-इस्लामी' या संस्थेच्या संपर्कात असलेल्या आणि कुख्यात दहशतवादी शहजाद भट्टी गँगशी निगडित असलेल्या बार्शी येथील 'अल हलिमी' या बनावट ट्रस्टचे, माजलगाव (जि. बीड) येथील 'गुलजार-ए-रजा' या बनावट ट्रस्टसोबत थेट आर्थिक संबंध असल्याचे उघडकीस आले आहे. यापूर्वीच माजलगावच्या या संस्थेवर गुन्हा नोंदवला गेला आहे. मात्र. आता ट्रस्टचे पाकिस्तानी कनेक्शन समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. काही महिन्यांपूर्वी छत्रपती संभाजीनगरच्या दहशतवाद विरोधी पथकाच्या बीड युनिटने माजलगावातील 'गुलजार-ए-रजा' या बनावट ट्रस्टचा भांडाफोड केला होता. या ट्रस्टने 5 वेगवेगळ्या बँक खात्यांद्वारे तब्बल 4 कोटी 73 लाख रुपयांची देणगी जमा केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. याप्रकरणी पोलिसांनी काही आरोपींना यापूर्वीच अटक केली असून ते सध्या कारागृहात आहेत. सध्या या संस्थेचे फॉरेन्सिक ऑडिट सुरु आहे

दरम्यान, असाच प्रकार सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथेही समोर आला होता. तेथे 'अल हलिमी' नावाने बनावट ट्रस्ट स्थापन करून सुमारे 10 कोटी रुपयांची देणगी गोळा करण्यात आल्याचे उघड झाले होते. आता या दोन्ही बनावट ट्रस्टच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक व्यवहारांची अत्यंत बारकाईने चौकशी केली जात आहे.

या दोन्ही संस्था आणखी कोणत्या धर्मादाय किंवा इतर संस्थांच्या संपर्कात होत्या का? तसेच या दोन्ही ट्रस्टच्या संपर्कात आलेल्या तरुणांची सद्यस्थिती काय आहे आणि ते नेमके कोणते व्यवसाय करत आहेत, या सर्व बाबींची सखोल पडताळणी एटीएसकडून केली जात आहे. या तपासातून येत्या काही दिवसांत आणखी अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, सुरक्षा यंत्रणा या प्रकरणाच्या मुळाशी पोहोचण्यासाठी वेगाने तपास करत आहेत.



"वर्षानुवर्षे काळाच्या ओघात झिजलेल्या श्री खंडोबा दिपमाळांना पुन्हा वैभव प्राप्त करून देण्याचा संकल्प आता अंतिम टप्प्यात...! लवकरच भक्तांच्या सेवेत नव्या तेजाने उजळणाऱ्या या ऐतिहासिक दिपमाळा...
॥ येळकोट येळकोट जय मल्हार ॥"

# निट पेपर फुटी प्रकरणातील दोषींवर तात्काळ कारवाई करावी या मागणीसाठी हजारोंचा समुदाय रस्त्यावर



**अंबाजोगाई :** नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर तात्काळ आणि कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी अंबाजोगाईतील तरुणाई व विविध पक्ष संघटना रस्त्यावर उतरल्या होत्या.

नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणातील दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी

तसेच लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी चाललेला खेळ थांबून त्यांना न्याय मिळावा, यासाठी दिल्लीत आंदोलन करणारे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आज अंबाजोगाई शहरात भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी खंबीर पाठिंबा दर्शवला. देशाच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना माफी नाही! अशा घोषणा देण्यात आल्या.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी, डॉ. राजेश इंगोले, डॉ. नरेंद्र काळे,कॉ. बब्रुवान पोटभरे, सुदर्शन रापतवार, सह नगरसेवक राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगावातील दलित वस्तीत नाल्यातील कचरा दोन दिवसांपासून रस्त्यावरच
## सम्राट अशोक नगरातील नागरिक त्रस्त रहदारीला अडथळा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर





### नगरपालिकेच्या हलगर्जीपणाबाबत नागरिकांमध्ये संताप

**माजलगाव :** (प्रतिनिधी)

माजलगाव शहरातील सम्राट अशोक नगर परिसरात नाल्यांची साफसफाई करून काढण्यात आलेला कचरा गेल्या दोन दिवसांपासून मुख्य रस्त्यावरच पडून असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दलित वस्तीतील या परिसरात दुर्गंधी, माशा आणि डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त होत असून, नागरिकांनी नगरपालिकेच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नाल्यांमधून काढलेला गाळ आणि कचरा तात्पुरता रस्त्याच्या कडेला टाकण्यात आला; मात्र तो उचलण्यासाठी कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. परिणामी हा कचरा मुख्य रस्त्यावरच पडून असल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या कचऱ्यातून दुर्गंधी पसरत असून संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना याचा अधिक त्रास होत असल्याचे सांगण्यात येत आहे. स्थानिक स्वच्छतेबाबत मोठमोठे दावे करणाऱ्या नगरपालिकेने प्रत्यक्षात मात्र या भागाकडे दुर्लक्ष केल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

सम्राट अशोक नगर परिसरातील रस्त्यावर पडलेला नाल्यातील कचरा तातडीने हटवून परिसराची स्वच्छता करावी, तसेच भविष्यात नाल्यांची साफसफाई केल्यानंतर कचरा त्वरित उचलण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी नगरपालिकेकडे व्यक्त केली आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत आठवडाभर सामाजिक सेवा उपक्रमांचे आयोजन

**परळी वैजनाथ:**

महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष, परळी शहराच्या वतीने दि. २२ ते २८ जुलै या कालावधीत विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजहिताला प्राधान्य देत नागरिकांसाठी उपयुक्त कार्यक्रमांची मालिका राबविण्यात येणार असून, या माध्यमातून ना. पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस सेवाभावी पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. नागरिकांनी या सेवा उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजप शहराध्यक्षा सौ. उमाताई चंद्रकांतअप्पा समशेट्टे यांनी केले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात बुधवार, दि. २२ जुलै रोजी जिजामाता उद्यान येथे होणाऱ्या चित्रकला स्पर्धेने होणार आहे. स्पर्धा दोन गटांत होणार असून, इयत्ता ५ वी ते ७ वी विद्यार्थ्यांसाठी रंग भरण स्पर्धा तर इयत्ता ८ वी ते १० वी विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण, जलसंवर्धन – काळाची गरज, जल है तो कल है, स्मरणचित्र व पशुसंवर्धन या विषयांवर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे आयोजन भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांनी केले आहे.

गुरुवार, दि. २३ जुलै रोजी वैद्यनाथ मंदिर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम होणार असून, त्याचे आयोजन भाजपा अल्पसंख्याक मोर्चा शहराध्यक्ष शमी शेख व अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष राहुल घोबाळे यांनी केले आहे.

शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी शिवाजीनगर येथील आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचे संयोजन नगरसेवक अश्विनकुमार आघाव यांनी केले आहे.

# रुग्णालयातील वॉटर फिल्टर 10 दिवसात बंद; मूलभूत सुविधांवर प्रश्नचिन्ह

**बीड, २० जुलै :** बीड जिल्हा रुग्णालयातील खाटांची कमतरता आणि रुग्णांची गैरसोय दूर करण्यासाठी सुमारे २४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले १०० खाटांचे 'माता व बाल रुग्णालय' नुकतेच रुग्णसेवेसाठी सुरू करण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतिशकुमार सोळंके आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांच्या हस्ते रुग्णालयाचे उद्घाटन करण्यात आले. मात्र, उद्घाटनानंतर अवघ्या दहा दिवसांतच येथील मूलभूत सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी रुग्णालयाच्या प्रत्येक मजल्यावरील प्रतीक्षागृहात वॉटर फिल्टर बसविण्यात आले आहेत. मात्र, सध्या हे सर्व वॉटर फिल्टर बंद अवस्थेत असल्याने रुग्ण व नातेवाईकांना बाहेरून बाटलीबंद पाणी खरेदी करावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या नव्या रुग्णालयात उद्घाटनानंतर काहीच दिवसांत पिण्याच्या पाण्याची सुविधा ठप्प होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी व्यक्त केली. या प्रकारामुळे रुग्णालयाच्या व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले. यापूर्वीही या नव्या इमारतीत उद्घाटनापूर्वी छताला गळती लागून पीओपी कोसळल्याच्या घटना घडल्या होत्या. तसेच लिफ्ट वारंवार बंद पडल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा त्रास सहन करावा लागला होता. काही प्रसंगी रुग्णांना झोळीतून वरच्या मजल्यावर नेण्याची वेळ आल्याचे प्रकारही समोर आले होते.

आता वॉटर फिल्टरही बंद पडल्याने रुग्णालयातील मूलभूत सुविधांच्या देखभाल आणि दुरुस्तीकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याची मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

# प्रा. मोतेकर लिखित बेसिक केमिस्ट्री पुस्तकाचे प्रकाशन



**माजलगाव प्रतिनिधी :** सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रा.श्रीनिवास चंद्रमोली मोतेकर लिखित 'बेसिक केमिस्ट्री-II' (Basic Chemistry-II) या शैक्षणिक पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. श्रीनिवास चंद्रमोली मोतेकर यांचे ''बेसिक केमिस्ट्री-II' (Basic Chemistry-II) हे पुस्तक बी.एस्सी. च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून यामध्ये

रसायनशास्त्र विषयातील मूलभूत संकल्पना सोप्या व सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी सदरील पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तकात नवीन अभ्यासक्रमतानुसार प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स आणि हार्मोन्सची रचना व महत्त्व, औषध निर्मितीचे नियम, फार्माकोलॉजी आणि विविध औषधांचे वर्गीकरण, ॲसिड-बेस सिद्धांतांसह सुपरॲसिड्स आणि सुपरबेसेसची सविस्तर माहितीचा समावेश करण्यात आला आहे. पुस्तक निर्मितीसाठी पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. सुधीर एस. अर्बुज यांचे विशेष सहकार्य लाभले .

प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्र.प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, माजी प्राचार्य डॉ. जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते,उपप्राचार्य प्रा. पवनकुमार शिंदे, विभागप्रमुख डॉ शंकर इप्पर, डॉ. ओमप्रकाश सारगे, डॉ.सतीश डाके, डॉ. सुदर्शन स्वामी, डॉ.सुहास गवळी, डॉ.अर्चना कचरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# श्रीमती शयनाअसनारे( सुगावकर) यांना सेवानिवृत्ती बद्दल भावपूर्ण निरोप



**अंबाजोगाई :** तालुक्यातील एल्डा येथील जिल्हा परिषदेतील सह शिक्षिका श्रीमती शयना रामराव असनारे ( सुगावकर) या 34 वर्षाच्या शासकीय सेवेनंतर नियत वयोमानानुसार 30 जून 2026 रोजी सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांना अंबाजोगाई येथे भावपूर्ण निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती अंबाजोगाई चे गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार तर प्रमुख उपस्थिती शिक्षण विस्तार अधिकारी अशोक कोपले हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर शिक्षण क्षेत्रातील

सर्वश्री माणिकराव सोळुंके, शिवाजी रोडे, परमेश्वर चामनार, सुंदर नेहरकर ,के डी सरवदे, विजय रापतवार, सरपंच सचिन करणार, परमेश्वर चालणार आदी मान्यवर उपस्थित होते, सौ. शायना असनारे या खोलेश्वर शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक सुनील सुगावकर यांच्या पत्नी आहेत. प्रारंभी सौभाग्यवती शयना आणि सुनील सुगावकर यांचा अध्यक्ष यांच्या वतीने शाल ,श्रीफळ ,पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला . याप्रसंगी सर्वश्री मधुकर सुवर्णकार, अशोक कोपले, सुनील सुगावकर, संकेत सुगावकर, सुबोध कुलकर्णी, सायली कुलकर्णी, सविता असणारे, टी डब्ल्यू देशपांडे, श्री पेडगावकर आणि खोडवे सर आदी मान्यवरांची श्रीमती शयना असनारे यांच्या कार्याचा गौरव करणारी समायोचित भाषण झाली, सत्काराला उत्तर देताना श्रीमती शयना सुगावकर यांनी 34 वर्षाच्या सेवा मध्ये त्यांनी जालना जिल्हा परतुर जिल्हा परिषद शाळा गिरवली तसेच अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा, रविवार पेठ अंबाजोगाई येथील शाळा घाटनांदुर तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येल्डा येथे सहशिक्षिका म्हणून सेवा केली. जिल्हा परिषद मध्ये सेवा करत असताना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना दोन आगाऊ वेतन वाडी आणि आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद च्या वतीने देऊन गौरविण्यात आहे अस त्यांनी आपल्या सत्कारला उत्तर देताना मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक साखरे यांनी तर सूत्रसंचालन श्री विष्णू सरवदे यांनी केले आणि आभार बाळू बनसोडे यांनी मानले. श्रीयुत जयेंद्र कुलकर्णी यांच्या पसायदानानी कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री घोरपडे आणि विष्णू सरवदे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील महिला आणि शिक्षक कर्मचारी तसेच मित्रपरिवार उपस्थित होते.

# प्रयास फाऊंडेशन, मुंबई व श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप



**गेवराई ( प्रतिनिधी ) :** गुरू आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड आयोजित प्रयास फाऊंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने श्री. संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय, जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव शाळेत मोफत शैक्षणिक साहित्य वाटप तर शाळेच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आला.

सोमवार दि.20 रोजी सकाळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव गोपिनाथ घुले तर प्रमुख पाहुणे म्हणून गुरू आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड अध्यक्षा सौ. सिमा मनोज ओस्तवाल, जनार्धन चितळकर (चेअरमन, से.स.सो. बेलगाव/बागपिंपळगांव), ऋषिकेश महानोर (उपसरपंच, बागपिंपळगाव), श्रीमती वैशाली वाघमारे (केंद्रप्रमुख, वसा. बागपिंपळगांव), विशाल राऊत (केंद्रप्रमुख, मन्यारवाडी), रामकृष्ण थोरात (अध्यक्ष, शालेय व्य. समिती, बागपिंपळगांव), मधुकर मुगुटराव (मा.ग्रा.पं. सदस्य, बागपिंपळगाव ) आदींची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या कष्टाची जान ठेवून शिक्षण घेतले पाहिजे. येथील सर्व विद्यार्थी ही शेतकऱ्यांचे मुले असून आपल्या आई वडिलांची मान अभिमानाने कशी उंचावेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले प्रास्ताविक पर भाषणात त्यांनी या कार्यक्रमाचे उद्दिष्ट व महत्त्व सांगितले. तर गुरू आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड अध्यक्षा सौ. सिमा मनोज ओस्तवाल यांनी आपल्या ट्रस्ट बद्दल माहिती सांगताना त्यांनी संस्थेचे स्थापना ते विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप यातील प्रवास व पुढील उद्दिष्टे तसेच संस्थेचे गोर गरीबांसाठी करण्यात येणाऱ्या कार्या बद्दल माहिती सांगून विद्यार्थ्यांना या शैक्षणिक साहित्याचा चांगला उपयोग करावा असे सांगितले. प्रमुख पाहुणे यांच्या भाषणानंतर शाळेतील सर्व विद्यार्थी मोफत शैक्षणिक साहित्य रजिस्टर, पेन व पेन्सिल वाटप केले. तर शाळेच्या वतीने पाचवी वर्गातील विद्यार्थी मोफत गणवेश वाटप करण्यात आला. अध्यक्षीय भाषणानंतर कार्यक्रम पार पाडण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरीभाऊ आघाव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, नवनाथ घुगे, हरिभाऊ आघाव, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदींनी परिश्रम घेतले.


## टि. सी. हरवला आहे

अंबाजोगाई ते परळी प्रवासादरम्यान रामराजा व्यंकटी मुळे या नावाचा बारावी (H.S.C.) पास चा टी. सी. आणि महत्त्वाच्या कागदपत्रांची बॅग हरवली आहे. सदरील टी. सी. आणि कागदपत्रांची बॅग कोणाला सापडल्यास व्यंकटी मुळे यांच्या पुढील मोबाईल नंबर वरती संपर्क करावा.
संपर्क क्रमांक : 8788140656

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पालकमंत्र्यांशी वाद नाही; नाराजी प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्हा नियोजन समितीची बैठक विविध विकासकामे, निधी वाटप, प्रशासनाची कार्यपद्धती, प्रलंबित प्रस्ताव आणि कथित अनियमिततेच्या मुद्द्यांमुळे चांगलीच गाजली. जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी समृद्धी महामार्गाच्या कामातील कथित अनियमितता, बेकायदेशीर मुरूम उत्खनन, खडी क्रेशर, प्रशासनाकडून लोकप्रतिनिधींच्या शिफारशींकडे होत असलेले दुर्लक्ष आणि विकासकामांतील विलंब यासारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर प्रशासनाला जाब विचारला.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना आमदार लोणीकर यांनी बैठकीत झालेल्या चर्चेची माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, बैठकीदरम्यान पालकमंत्र्यांशी कोणताही वाद किंवा मतभेद झालेला नाही. काही माध्यमांमध्ये पालकमंत्र्यांशी वाद झाल्याच्या चर्चा सुरू असल्या तरी त्या वस्तुस्थितीपासून दूर असल्याचे त्यांनी सांगितले. लोणीकर म्हणाले की, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते. प्रत्येकाने आपल्या मतदारसंघातील विकासकामे, निधी, प्रलंबित प्रस्ताव आणि नागरिकांच्या समस्यांबाबत पालकमंत्र्यांसमोर मुद्दे मांडले. ही बैठक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची होती आणि सर्वांनी जिल्ह्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. बैठकीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो समृद्धी महामार्गाच्या कामासाठी झालेल्या कथित बेकायदेशीर मुरुम उत्खननाचा. लोणीकर यांनी दावा केला की, समृद्धी महामार्गाच्या विविध कामांसाठी तब्बल १० लाख ब्रास-पेक्षा अधिक मुरूमाचे उत्खनन करण्यात आले. मात्र त्यासाठी शासनाकडे केवळ सुमारे ७८ हजार ब्रास मुरूमाचीच रॉयल्टी भरल्याची माहिती उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडाल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी संपूर्ण उत्खननाची स्वतंत्र आणि अधिकृत मोजणी करण्याची मागणी बैठकीत पुन्हा केली. प्रत्यक्षात किती मुरूम काढण्यात आला, किती रॉयल्टी भरली गेली आणि शासनाचे किती नुकसान झाले, याची निष्पक्ष चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. लोणीकर यांनी वाटूर परिसरात सुरू असलेल्या खडी क्रेशरचाही मुद्दा उपस्थित केला. संबंधित क्रेशरला आवश्यक परवानग्या आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची ना हरकत (छजउ) नसतानाही ते सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन होत असल्यास संबंधितांवर कारवाई का होत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित करत प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी केली. बैठकीत बोलताना लोणीकर यांनी प्रशासनाच्या कारवाईतील कथित दुहेरी निकषांवरही टीका केली. मोठ्या कंत्राटदारांवर कारवाई होत नसताना एका छोट्या ट्रॅक्टर चालक आणि त्याच्या पत्नीवर कठोर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असावी. मोठ्या आणि प्रभावशाली व्यक्तींवर कारवाई टाळून सामान्य नागरिकांवर कठोर कारवाई केली जात असेल तर त्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात, असे त्यांनी सांगितले. बैठकीदरम्यान लोकप्रतिनिधींनी व्यक्त केलेली नाराजी ही पालकमंत्र्यांविषयी नसून जिल्हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीविषयी असल्याचे लोणीकर यांनी स्पष्ट केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, विविध विकासकामांसाठी आमदार आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या शिफारशींकडे प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नाही. अनेक प्रस्ताव आणि फाईली महिनोनमहिने प्रलंबित राहतात. त्यामुळे विकासकामांना विलंब होत असून नागरिकांनाही त्याचा फटका बसत आहे.



## संक्षिप्त

### जालन्यात २५ जुलैपासून आनंदीस्वामींची यात्रा



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

येथील छोटे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री. आनंदी स्वामींची आषाढीनिमित्त येत्या २५ जुलैपासून यात्रा सुरू होणार आहे. यानिमित्त आमदार अर्जुनराव खोतकर यांनी लाखो भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत यात्रेतील सोयी, सुविधा आणि सुरक्षेचा आढावा घेतला.

शांतता समितीच्या या बैठकीस उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख गणेशराव सुपारकर, माजी नगरसेवक शंकर लुंगे , मनोज इंगळे लक्ष्मणराव सुपारकर , संताजी वाघमारे,पोलीस उपअधीक्षक अनंतराव कुलकर्णी, पोलिस निरीक्षक शेवाळे,संस्थांचे अध्यक्ष रमेशराव ढोले, पालिका उपायुक्त विजय फुलंब्रीकर, नगर अभियंता सऊद, शाह आलमखान, इकबाल पाशा, राहुल सुपारकर महावितरण चे अभियंता राजाभाऊ नागरे आदी उपस्थित होते. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देताना सांगितले की, श्री आनंदी स्वामींच्या यात्रेस सुमारे दोन लाखावर भाविक हजेरी लावतात. विशेषता महिलांची संख्या लक्षणीय असते. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी सुरक्षा आणि वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून विशेष खबरदारी घ्यावी. मंदिर परिसरात महिला पोलीस, साध्या विषयातील पोलीस आणि पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवावा. यात्रेच्या काळात या भागातील वीज अजिबात गायब होणार नाही याची खबरदारी घ्यावी. वीज वितरणचे कार्यकारी अभियंता .....यांना फोनवरून सूचना दिल्या तसेच यात्रेस कमी कालावधी असल्याने रस्त्यातील खड्डे तत्काळ बुजवावेत. नाल्यावर ढापे टाकावेत, पालखी मार्गात कुठेही अडचण आणि गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी घेण्यात यावी, अशा सूचना केल्या. यावेळी उपमहापौर राजेश राऊत यांनी सांगितले की, महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांनी आज पालखी मार्गाला भेट दिली असून सोयीसुविधानाबाबत आढावा घेतला आहे. आमदार खोतकर यांनी केलेल्या सूचनेनुसार पालिकेच्या कर्मचाऱ्यांना सांगितले जाईल, अशी ग्वाही दिली.

### पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई; उपाययोजना करा -प्रकाश सोळंके




**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील सिंगोना गावात दिनांक ७ जून ते १६ जुलै या कालावधीत तब्बल ३५ दिवस पाऊस न पडल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा गंभीर परिस्थितीत गावासाठी शासनाच्या विविध योजनांमधून उभारण्यात आलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरीवर संबंधित शेतकऱ्याने ताबा घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने याबाबत जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली असून, तसेच उपविभागीय अधिकारी, परतूर आणि तहसीलदार, परतूर यांच्याकडेही स्वतंत्र निवेदन देऊन सदर प्रकरणात तात्काळ चौकशी व कारवाईची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, सदर विहीर ही दलित वस्ती योजना तसेच इतर शासकीय निधीतून उभारण्यात आली असून पूर्वी ग्रामपंचायत सिंगोना मार्फत गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत होता.

सातबारा उतारा, फेरफार नोंदी, ग्रामपंचायतीच्या नोंदी, महावितरणची वीज बिले व इतर कागदपत्रांवरून ही विहीर सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेसाठी वापरात असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र संबंधित शेतकऱ्याने विहिरीभोवती कंपाऊंड उभारून गावकऱ्यांना पाणी भरण्यास मज्जाव केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर विहिरीची प्रत्यक्ष पाहणी करून ती सार्वजनिक असल्याचे निष्पन्न झाल्यास तात्काळ ग्रामपंचायत सिंगोना यांच्या ताब्यात देण्यात यावी, गावकऱ्यांसाठी तातडीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच सरकारी विहिरीवर बेकायदेशीर ताबा घेणाऱ्या संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## दरोडा व मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपी अनिकेत जाधव जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

दरोडा व मोक्का गुन्ह्यातील तब्बल नऊ महिन्यांपासून फरार असलेला आरोपी अनिकेत संतोष जाधव (वय २०, रा. गुंडप्पा गल्ली, डबल जिन, जालना) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १८ जुलै रोजी अटक केली. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे गांधी चमन परिसरातून ही कारवाई करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ ऑक्टोबर २०२५ रोजी शासकीय कंत्राटदार शैलेश देविदास यांच्या घरावर सशस्त्र दरोडा टाकण्यात आला होता. या प्रकरणी चंदनझिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपासादरम्यान आरोपींवर भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. या गुन्ह्यातील आरोपी अनिकेत जाधव हा गुन्हा घडल्यानंतर फरार होता. पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांनी विशेष पथक तयार करून आरोपीचा शोध सुरू ठेवला होता. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीला ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी तपास अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव तसेच त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालन्यात सर्वपक्षीय समितीतर्फे अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सर्वपक्षीय जयंती उत्सव समिती, जालना यांच्या वतीने त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व परिवर्तनवादी कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना विधानसभा मतदारसंघाचे लाडके आमदार श्री. अर्जुनभाऊ खोतकर हे होते. समितीचे अध्यक्ष किरण सिरसाठ यांनी प्रास्ताविक केले, तर कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे यांनी आपल्या मनोगतात अण्णाभाऊ साठे यांच्या समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाच्या विचारांचा समाजाने अंगीकार करून ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करत समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी समितीचे अध्यक्ष किरण सिरसाठ, उपाध्यक्ष इब्राहिम शेख, कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे, सचिव संतोष मच्छिंद्र रासवे, संजू गायकवाड, शिवसेना संपर्क प्रमुख पंडितदादा भुतेकर, संतोष निकाळजे, किशोर कांबळे, संतोष तुपसुंदर, डी. ई. नामवड, संतोष कांबळे, रवी शोरात, ओंकार घोडे, मयूर गोफणे, राम सुतार, गणेश चौधरी, अशोक तांवे, राहुल जाधव, राजेश सगट, आकाश दळीजे, जय आठवले, दिपक आमीलढंगे आणि अंकुश यंगड यांच्यासह समितीचे पदाधिकारी, विविध पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सचिव संतोष मच्छिंद्र रासवे यांनी मानले.

## 'कायद्याचे हात' गुटखा माफियांपर्यंत पोहोचणार कधी! मंठ्यात अवैध विक्रीवर प्रश्नचिन्ह?

### पाच रुपयांची पुडी २५ ला, २५ ची १०० ला! मंठ्यात गुटखा काळाबाजार तेजीत

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात अवैधरित्या गुटख्याची विक्री पुन्हा जोर धरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मागील दोन-तीन महिन्यांत मंठा पोलिसांनी शहरातील गुटखा विक्रीवर काही प्रमाणात आळा घालण्यात यश मिळविले होते. मात्र, आता काही पानटपऱ्या, गल्लीबोळातील किराणा दुकाने तसेच ग्रामीण भागातील किराणा दुकानांतून पुन्हा खुलेआम गुटखा विक्री सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

शहरातील काही गुटखा माफिया विविध मार्गांचा अवलंब करून आपल्या हस्तकांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील किराणा दुकानांपर्यंत गुटख्याचे पार्सल पोहोचवत असल्याचा आरोप केला जात आहे. या दुकानांमधून ग्राहकांना सर्रास गुटखा विकला जात असल्याचेही सांगितले जात आहे.



संग्रहीत छायाचित्र

सुमारे पंधरा दिवसांपूर्वी मंठा पोलिसांनी दोन किराणा दुकानांवर कारवाई केली होती. मात्र, त्या कारवाईचा पुढील तपास नेमका कुठपर्यंत पोहोचला, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नसल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

अवैध विक्रीमुळे गुटख्याच्या किमतींमध्येही मोठी वाढ झाली आहे. पाच रुपयांची पुडी तब्बल २५ रुपयांना, तर २५ रुपयांचे गुटख्याची पुडी १०० रुपयांपर्यंत विकले जात असल्याचे सांगितले जात आहे. या काळाबाजारामुळे गुटखा माफिया मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ मिळवत असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. अन्न व औषध प्रशासन तसेच मंठा पोलीस या प्रकरणाकडे दुर्लक्ष करत आहेत का ? की त्यांच्यापर्यंत माहितीच पोहोचत नाही? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. तसेच, कायद्यापेक्षा गुटखा माफियांचे हात लांब झाले आहेत का? अशीही दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अवैध गुटखा साठवणूक, वाहतूक व विक्री करणाऱ्या मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागातील सचिव तुकाराम मुंढे, विभागीय आयुक्त तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी गांभीर्याने लक्ष देऊन मंठा तालुक्यातील गुटखा माफियांचा काळाबाजार उघडकीस आणावा अशी मागणी नागरिकातून होत आहे.



## अर्जुन पाडेवार यांच्या पुढाकारणे एसआयआरच्या कामाला गती

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

सध्या शहरात एसआयआर (स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हीजन) चे काम वेगात सुरु असून गाव भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिसरात सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांच्या पुढाकारातून या कामाला गती प्राप्त झाली आहे. दरम्यान, लोकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे एसआयआरचे महत्व समजावून सांगणे, विविध कागदपत्रांची पूर्तता करणे या व इतर कामात सामाजिक कार्यकर्ते पाडेवार हे मतदारांना वेळोवेळी सहकार्य करीत आहेत.

परिसराचे बीएलओ रघुनाथ चव्हाण हे देखील एसआयआरबाबत लोकांमध्ये जनजागृती करणे व इतर कामी नागरिकांना सहकार्य करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात यावेळी कमलाकर पाडेवार व इतरांची उपस्थिती होती.

### पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक

# जिल्हा वार्षिक योजना सन २०२६ -२०२७ साठी ५४७.९७ कोटी रुपयांच्या आराखड्याला मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**




जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासाला गती देण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी ५४७.९७ कोटी रुपयांच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. मंजूर कामे गुणवत्तापूर्ण व विहित मुदतीत पूर्ण करून उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्यावर भर देत, विकासकामांच्या अंमलबजावणीला अधिक गती देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. बैठकीस खासदार कल्याण काळे, आमदार सर्वश्री अर्जुन खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, विक्रम काळे, सुहास शिरसाठ, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, महापालिका आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल आणि जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत सन २०२६-२७ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या (सर्वसाधारण) ४७० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ७५ कोटी, एकात्मिक आदिवासी विकासाठी २.९७ अशा एकूण ५४७.९७ कोटी रुपयांचा जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा समितीसमोर सादर करण्यात आला व त्यावर सविस्तर चर्चा करून मान्यता देण्यात आली. बैठकीत मागील तीन वर्षांतील जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. खासदार कल्याण काळे आणि आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे यांनी मंजूर निधी वेळेत खर्च न झाल्याने तो शासनाकडे परत गेल्याबाबत प्रश्न उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. यावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी रखडलेल्या कामांची संख्या, त्यासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही आणि संबंधित कामे कशा पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहेत, याबाबत संबंधित विभागांनी सात दिवसांत सविस्तर अहवाल व सादरीकरण सादर करण्याचे निर्देश दिले. सखोल चौकशीनंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच यापुढे सर्व प्रशासकीय यंत्रणांनी जिल्हा वार्षिक योजनेतील मंजूर कामे विहित मुदतीत पूर्ण करून प्राप्त निधी नियोजित कालावधीत खर्च करण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीत जाफराबाद, मंठा आणि परतूर येथील दिवाणी न्यायालयांच्या इमारतींमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, समाजकल्याण विभाग, आरोग्य केंद्रे, रस्ते विकास तसेच लोक प्रतिनिधींच्या मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी निधी मंजुरीसह अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री पंकजा मुंडे, उपस्थित लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित दादा पवार तसेच माजी आमदार दिवंगत सुरेश जेठलिया यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच शेतकऱ्यांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' आणि वीजबिल सवलतीची घोषणा केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या अभिनंदन ठरावाची प्रत मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्याचे सादरीकरण केले. बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांनी केले. बैठकीस जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




नांदेड -डॉ. सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ शहरातील महात्मा फुले पुतळ्यासमोर एक दिवसीय सत्याग्रह करण्यात आला.

# ल्याहरी येथील ज्ञानवर्धिनी माध्यमिक विद्यालय पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २० जुलै -**

झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश कृतीतून देत ज्ञानवर्धिनी माध्यमिक विद्यालय, ल्याहरी येथे सेवापूर्ती सत्कार समारंभाचे औचित्य साधून वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. सेवापूर्तीचा आनंद पर्यावरण संवर्धनाच्या सामाजिक बांधिलकीशी जोडत उपस्थितांनी वृक्ष लागवडीचा संकल्प केला.

शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी विद्यालयात एस. आर. डमरे तसेच एम. एस. काकडे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभात त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी दोन्ही मान्यवरांनी विद्यालयाला वृक्षाची भेट देत स्वतः वृक्षारोपण केले. त्यामुळे सेवापूर्तीच्या स्मृतीला पर्यावरण संवर्धनाची चिरंतन जोड



मिळाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष सु. सो. दुधारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव ए. एम. चौरे, संस्थेच्या कोषाध्यक्ष आशाताई औटे तसेच मयुरी खंदारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेच्या वतीने सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक एन. एस. जाधव यांनी सेवापूर्ती ही केवळ नोकरीचा शेवट नसून समाजसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन एस. एन. पाटील यांनी प्रभावीपणे केले, तर एन. टी. चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात सु. सो. दुधारे म्हणाले, आजच्या वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे. वृक्षारोपण हा केवळ एक उपक्रम नसून भावी पिढीला दिलेला अमूल्य वारसा आहे. पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमास एस. आय. शेख, एस. डी. होनपारखे, पी. ए. चौरे, एम. व्ही. चौरे, डी. एन. जीवने, बी. डी. बोरकर, एस. पी. कांबळे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदेड जिल्ह्यात धनादेश अनादराची २३ प्रकरणे तडजोडीने निकाली

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र के. ब्रम्हे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणांसाठी विशेष लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते.विशेष लोकन्यायालय यशस्वी होण्यासाठी वकील आणि बँक अधिकाऱ्यांसमवेत पूर्वनियोजित बैठका घेण्यात आल्या. तसेच तालुकास्तरीय न्यायाधीशांशी आभासी (ऑनलाईन) पद्धतीने संवाद साधून नियोजन करण्यात आले.या विशेष लोकन्यायालयामध्ये नांदेड जिल्ह्यातील एकूण २३ धनादेश अनादराची प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या माध्यमातून २९ लाख ४४ हजार १५६ रुपये इतक्या रकमेची वसुली करण्यात आली.लोकन्यायालयामुळे संबंधित पक्षांचा वेळ, श्रम आणि खर्चाची बचत होऊन न्यायदानाची प्रक्रिया अधिक सुलभ व जलद होते. विशेष लोकन्यायालयाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा व तालुका न्यायालयांतील न्यायाधीश, कर्मचारी, शिपाई, जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक, व्यवस्थापक तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद जी. देशपांडे यांनी या विशेष लोकन्यायालयाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला किनवटमध्ये जाहीर पाठिंबा

**किनवट-** देशातील प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी डॉ. सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाला किनवटमधील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. यासंदर्भातील



निवेदन सोमवारी उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी,किनवट यांना आज(दि. २०) निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, डॉ. सोनम वांगचुक हे नीट पेपरफुटी प्रकरण, संविधानात्मक हक्कांचे संरक्षण तसेच विविध राष्ट्रीय प्रश्नांवर शांततापूर्ण बेमुदत उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या प्रकृतीत बिघाड होत असतानाही केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांकडे अद्याप अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. देशहितासाठी कार्य करणाऱ्या समाजसेवक व पर्यावरणवादी व्यक्तीच्या मागण्यांवर केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घेत संवाद साधावा, तसेच त्यांच्या मागण्यांवर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. नागरिकांच्या भावना केंद्र शासनापर्यंत पोहोचवाव्यात, अशी विनंतीही उपविभागीय अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. या निवेदनावर भारत जोडो युवा अकादमीचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, प्राचार्य डॉ. सागर एस. शिल्लेवार, रविंद्र शंकरराव नवघडे, सेक्युलर मुव्हमेंट नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. मिलिंद सर्पे, माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के. मूर्ती आणि ज्येष्ठ पत्रकार नसिर तगाले यांच्यासह विविध मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या निवेदनावर आहेत.

## एसआरपीएफ अल्ताफ शेखचा रजा कमिटीतर्फे सत्कार

**आदमपूर**-मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा येथील अल्ताफ एकबाल शेख चा रजा कमिटीच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.अल्ताफ या युवकाची नुकतीच राज्य राखीव पोलीस बल गट जालना या ठिकाणी सशस्त्र पोलीस शिपाई' म्हणून निवड झाल्याबद्दल सप्रेम भेट देत अभिनंदन करीत शुभेच्छां देण्यात आल्या. अत्यंत कष्टदायी दांपत्याच्या मुलाने यश मिळविल्याबद्दल अल्ताफ ठिकठिकाणी अभिनंदन होत आहे.यावेळी शेकापचे राज्य मध्यवर्ती मध्यवर्ती सदस्य तथा राष्ट्रीय अल्पसंख्यांक परिषदेचे तालुकाध्यक्ष असदभाई बल्खी, राष्ट्रीय अल्पसंख्यांक परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार मेहताब शेख,चांडोळा मस्जिदचे हाफिज मौलाना अहेमद रजवी,चांडोळा बँक सहाय्यक महमदरफी मदार, ग्राम आरोग्य अधिकारी गोंदिया,शेख सुलेमान,धर्मादाय निरीक्षक जमीर शेख,कर सहाय्यक जीएसटी मुंबई आरिफ तांबोळी,ठाणे पोलीस शेख शादूल, खदीर भाई शेख,शब्बीर भाई बल्खी,मौला पठाण, शेख, शेख सिराज,गौस शेख,इम्रान शेख,रफीक शेख,अयान, पाशामियाँ शेख,शेख नबी,शेख जुबेर, सोहेल पठाण,शेख सुलतान, शेख अरबाज,शेख गफार, शेख युनूस आदि बांधव उपस्थित होते.

# मुदखेड तालुक्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने महामोर्चात सहभागी व्हावे: डॉ. हर्षवर्धन दवणे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २० जुलै -**

अनुसुचित जातींच्या उपवर्गीकरण विरोधात नांदेड येथील महामोर्चा संदर्भात भन्ते गगन बोधी यांच्या अध्यक्षतेखाली बौध्द प्रशिक्षण केंद्र मुदखेड येथे दि.१९ जुलै रोजी बौध्द बांधवांच्या वतीने बैठक घेण्यात आली. या बैठकीला कृती समितीचे डॉ हर्षवर्धन दवणे, स्वप्नील नरबाग, नगरसेवक कुलदीप राक्षसमारे, अतिश ढगे, यांनी उपस्थित राहुन सर्व डउ बांधवांना दि.९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी नांदेड जिल्हा कृती समितीच्या वतीने येत्या ९ ऑगस्ट रोजी नांदेड शहरात महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चात सामील होण्यासाठी कृती समितीने अनुसूचित जातीतील ५९ जातींना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उपवर्गीकरणाच्या निर्णयामुळे अनुसूचित जातीतील ५९ जातींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होत आहे. डॉ.बाबासाहेब



आंबेडकरांनी दिलेले आरक्षण हे एकसंध आहे. ते तोडू देणार नाही.

कृती समितीचे डॉ. हर्षवर्धन दवणे म्हणाले, महार, मांग, चांभार, मातंग, भंगी, धोर, होळार अशा अनुसूचित जातीतील सर्व ५९ जाती एक आहेत. आमच्या एकतेला तडा जाऊ देणार नाही. नांदेडचा हा महामोर्चा ऐतिहासिक होईल.त्यासाठी मुदखेड तालुक्यातील खुजडा, टाकळी, वासरी, माळकौठा, मेंडका सह इतर गावातील सर्व डउ समाज बांधवांनी दि.९ ऑगस्ट रोजी महात्मा ज्योतीराव फुले पुतळा आय, टी,आय, नांदेड येथे मोठ्या संख्येने या महामोर्चात सहभागी व्हावे. कोणत्याही पक्ष-संघटनेचा झेंडा न घेता फक्त निळा ध्वज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो घेऊन यावे. यावेळी तालुक्यातील व शहरातील सर्व एस सी समाज बांधवांची उपस्थिती होती.

# शाळेत पीएसआय मुरारी गायकवाड यांचा प्रेरणादायी उपक्रम; विद्यार्थ्यांना दिले शिस्तीचे धडे

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २० जुलै -**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शिक्षकच नव्हे, तर समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्तींचे मार्गदर्शनही तितकेच महत्त्वाचे ठरते.याच भावनेतून किनवट तालुक्यातील मांडवी पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस उपनिरीक्षक मुरारी गायकवाड कोकलेगांवकर यांनी जिल्हा परिषद हायस्कूल, मांडवी येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना शिस्त, शिक्षण आणि वाहतूक सुरक्षिततेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने शाळेत ये-जा करणाऱ्या ऑटोरिक्षांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक होऊ नये, यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने त्यांनी शाळेला भेट दिली. यावेळी शाळा सुटल्यानंतरही शिक्षक नागेश गेडाम विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त तासिका घेत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. विद्यार्थ्यांप्रती असलेली शिक्षकांची निष्ठा आणि समर्पण पाहून गायकवाड यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. यानंतर त्यांनी स्वतः वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. शिक्षणाचे महत्त्व, वेळेचे नियोजन, शिस्तबद्ध जीवनशैली, चांगले संस्कार, सामाजिक जबाबदारी, कायद्याचा आदर आणि वाहतूक नियमांचे पालन या विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या व प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले.तसेच वाहनात प्रवास करताना स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याचे आणि पालकांनाही वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जागरूक करण्याचे

आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. पोलीस अधिकारी म्हणून नव्हे, तर मार्गदर्शक आणि शिक्षकाच्या भूमिकेतून विद्याथ्यर्थ्यांशी साधलेला हा संवाद विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांच्या या उपक्रमाचे शिक्षक, पालक आणि नागरिकांकडूनही कौतुक होत आहे. शाळेला प्रथमच भेट दिल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक मुरारी गायकवाड यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप राठोड, सदस्य शेखर दिसलवार, शिक्षक नागेश गेडाम, शशिकांत कांबळे, आकाश राठोड, संतोष कांबळे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग व्यक्तींनी राष्ट्रीय पुरस्कारांसाठी ३१ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुलै -**

दिव्यांगजन सशक्तीकरण विभागामार्फत वर्ष २०२६ च्या दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीच्या राष्ट्रीय पुरस्कारांसाठी अर्ज व नामांकन स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुकांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत www.awards.gov.in या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय पुरस्कारांसाठी अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार असून प्रत्यक्ष (Physical Mode) किंवा इतर कोणत्याही माध्यमातून सादर करण्यात आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. ३१ जुलै २०२६ पर्यंत प्राप्त होणाऱ्या सर्व अर्ज व नामांकनांचा वर्ष २०२६ च्या राष्ट्रीय पुरस्कारांसाठी विचार करण्यात येईल.

नामांकनामध्ये पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यानुसार सर्व आवश्यक माहिती भरावी. अर्जदाराने केलेली उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी वर्णनात्मक स्वरूपात स्पष्टपणे नमूद करावी. तसेच संबंधित कामगिरीची पुष्टी करणारी आवश्यक कागदपत्रेही पोर्टलवर अपलोड करावीत.

'सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन (Most Outstanding Person with Disabilities)', 'श्रेष्ठ दिव्यांगजन (Outstanding Person with Disabilities)' आणि 'श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बालक/बालिका (Outstanding Creative Divyang Child)' या उपवर्गांसाठी अर्ज करताना यूडीआयडी (णऊखऊ) कार्ड किंवा दिव्यांगत्व प्रमाणपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे.

पात्रता निकष, पुरस्कारांच्या विविध श्रेणी व इतर सविस्तर माहितीसाठी www.depwd.gov.in VgoM www.awards.gov.in या संकेतस्थळांवरील 'दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीच्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा' संदर्भ घ्यावा.

# स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ ते २८ जुलैदरम्यान विविध सामाजिक उपक्रम

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २० जुलै -**

स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत विविध सामाजिक, जनजागृती व जनहिताचे उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

देगलूर शहरातील उदगीर रोड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या मध्यवर्ती कार्यालयात सोमवारी (दि. २० जुलै) झालेल्या या पत्रकार परिषदेच्या अध्यक्षस्थानी नांदेड जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर होते. यावेळी त्यांनी जयंती सप्ताहानिमित्त आयोजित विविध उपक्रमांची माहिती देत नागरिक व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन केले.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव



पाटील गोजेगावकर यांच्यासह राष्ट्रवादीचे नेते लक्ष्मीकांत पद्मवार सावकार, मधुकर नारलावार, नगरसेवक नंदकिशोर शाखावार, व्यंकट कांबळे, शहराध्यक्ष देवेंद्र सावकार मोतेवार, मिलिंद रामचंद्र बीरकंगन, मनोज तोटावर, बालाजी मैलागिरे, दिगंबर कडालवार, नगरसेवक अनिल बोनलावार, प्रा. उत्तमकुमार कांबळे, सय्यद सर, अथर हाश्मी, खालिद पटेल, दिगंबर कौरवार, सादक भाई, पाशा भाई, ओमकार उल्लेवार, विकास मोरे, शरीफ मामू, मोईन मिस्त्री, संजय चिन्नामवार, राज गायकवाड, सय्यद मोहियोद्दीन, शेख शरीफ, ध्याडे अप्पा, संतोष उनग्रततवार, अनिल तोतडे, योगेश मैलागिरे आदी कार्यकर्ते तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत जयंती सप्ताहात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, आरोग्य, जनजागृती व लोकहिताच्या उपक्रमांची रूपरेषा सविस्तर मांडण्यात आली. या माध्यमातून समाजोपयोगी कार्यांना चालना देण्याचा पक्षाचा मानस असल्याचे सांगण्यात आले. सप्ताहातील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी संतुलित उत्पादनावरील मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुलै -**

गोदावरी फाउंडेशन, तुकाई प्रतिष्ठान, तुकाई फार्मर प्रोड्युसर कंपनी आणि ऑथेंटिक ग्रीन सोल्यूशन कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी हळद पिकांचे संतुलित उत्पादन या विषयावरील मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या कार्यशाळेला परिसरातील प्रगतशील व प्रयोगशील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नुकतेच झी २४ तास या आघाडीचे वृत्त वाहिनीच्या वतीने हळदीसाठी दिलेल्या बहुमोल योगदाना बदल बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष आमदार हेमंत पाटील यांना मराठवाडा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.याकरिता त्यांचा सत्कार करण्यात आला.या सत्काराला उत्तर देताना आ.हेमंत पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हाच खरा सन्मान असल्याचे सांगत, शेतकऱ्यांनी संशोधन केंद्राशी सातत्याने जोडले जावे आणि संशोधन केंद्रानेही शेतकरी केंद्रित संशोधनाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

ऑथेंटिक ग्रीन सोल्यूशनचे संस्थापक संचालक तथा कृषिशास्त्रज्ञ डॉ.मोहन बेलगमवार यांनी मृदा आरोग्य, जमिनीची सुपीकता, मृदा आरोग्य पत्रिका आणि संतुलित खत व्यवस्थापन यांचे महत्त्व पटवून देत, हळद पिकातून दर्जेदार व अधिक उत्पादन कसे मिळवता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी कृषीभूषण पी.के.कदम,संशोधन केंद्राचे संचालक गड्डूसेठ मुरक्या, संचालक संभाजी सिद्धेवार, वसंत सहकारी कारखान्याचे अध्यक्ष अजय देशमुख,संचालक रीतेश जुजाराव, तुकाई प्रतिष्ठानच्या अध्यक्षा कीर्ती तगडपल्लेवार,रमेश देशमुख,डॉ.अनिकेत पाटील,पंकज कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## नगर परिषद, उमरी जि. नांदेड
## जाहीर सूचना

जावक कर्मांक १३७४/२०२६ दिनाक २०/७/२०२६

**शासन निर्णय दिनांक २५/०३/२०२६ अन्वये शासकीय जमिनीवरील दिनांक ०१-०१-२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत.**

उमरी नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरिक यांना सूचित करण्यात येते की, महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-१/जमीन-१, दिनांक २५ मार्च २०२६ अन्वये दिनांक ०१-०१-२०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे विशिष्ट अटी व शर्तीवर नियमित करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.

करिता उमरी शहरातील शासकीय जमिनीवरील दिनांक ०१-०१-२०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमित करून घ्यावयाची असल्यास, संबंधित अतिक्रमणधारकांनी ३१-१२-२०२६ पर्यंत दिनांक ०१-०१-२०११ पूर्वीचे पुरावे जोडून अर्ज नगर परिषद उमरी कार्यालयात जमा करावेत.

**अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्रता व पुरावे**

दिनांक ०१-०१-२०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे असावीत.

दिनांक ०१-०१-२०११ पूर्वीच्या मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कराची पावती किंवा निवासी पुराव्यासाठीचे इतर शासकीय दस्तऐवज (शिधापत्रिका वगळून) जसे नगरपरिषद मधील आठ-अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना इत्यादी पुरावे ग्राह्य धरले जातील. उपग्रह छायाचित्र हाही एक महत्त्वाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाईल. तसेच, चालू पुरावा म्हणून मागील एका वर्षातील उपरोक्त पुराव्यांपैकी रहिवासाचा शासकीय पुरावा देणे आवश्यक राहील. तसेच कच्च्या घराचा कुटुंबासह जिओटॅग केलेला फोटो, प्रतिज्ञापत्र / शपथपत्र जोडणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे अर्ज दिनांक ३१-१२-२०२६ पर्यंत प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णय क्रमांक जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-१/जमीन-१, दिनांक २५ मार्च २०२६ नुसार कार्यवाही करून अतिक्रमणे नियमित करण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **(गणेश चाटे)** | **(सौ.शकंतला भगवान मुदीराज)** | **(कैलास श्रीनिवासराव देशमुख)** |
| **मुख्याधिकारी नगरपरिषद उमरी जि. नांदेड** | **नगराध्यक्षा नगरपरिषद उमरी जि. नांदेड** | **उपनगराध्यक्ष नगरपरिषद उमरी जि. नांदेड** |

# देगलूर-बिलोलीतील विविध प्रश्नांवर आ.अंतापूरकरांचा प्रशासनाला जाब

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २० जुलै -**

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांवर आमदार जितेश अंतापूरकर यांनी प्रशासनाला जाब विचारत जनहिताच्या मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडली. वीजपुरवठा, पीक विमा, अवैध रेती उत्खनन, स्मशानभूमी विकास,पाणी टंचाई प्रश्न तसेच इतर पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी करत पालकमंत्री अतुल सावे यांचे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नाकडे वेधले लक्ष



बैठकीत आ.अंतापूरकर यांनी महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्याचा मुद्दा प्राधान्याने उपस्थित केला. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने वीज मिळणे, कृषीपंपांना वेळेवर वीज उपलब्ध न होणे आणि तांत्रिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील नागरिक व शेतकरी त्रस्त असल्याचे त्यांनी सांगितले. वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.पीक विमा योजनेतील हमीपत्राचा त्यांनी मुद्दा उपस्थित केला.

गावागावांतील स्मशानभूमींमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आणत रस्ते, संरक्षक भिंती, पिण्याचे पाणी, वीज आणि शेड आदी सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. अवैध रेती उत्खननामुळे पर्यावरणाची हानी, महसुलाचे नुकसान आणि नागरिकांना होणारा त्रास याकडेही त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. या प्रकारांवर कठोर कारवाई करून संबंधित यंत्रणांनी प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

याशिवाय मतदारसंघातील विविध विकासकामे, रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक सुविधा आणि अन्य प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाने निश्चित कालमर्यादेत कार्यवाही करावी, अशी मागणी अंतापूरकर यांनी बैठकीत केली.

या बैठकीस जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खा. अशोकराव चव्हाण, खा. अजित गोपछडे, खा. रवींद्र चव्हाण, जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदार तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**आधार केंद्र तात्काळ चालू करा.**

विधानसभा मतदारसंघातील शहर व ग्रामीण भागातील नागरीकांचे आधार केंद्र निगडीत सर्व प्रकीया सुलभ व्हावी अशी मागणी आ.अंतापूरकर यांनी यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडे मागणी केली